भारत सरकार

**विधि व न्याय मंत्रालय**

सत्यमेव जयते

# भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२

**( सन १९३२ चा अधिनियम क्रमांक ९ )**

[ १ मार्च, १९९८ रोजी यथाविद्यमान ]

# The Indian Partnership Act, 1932

**( Act No. 9 of 1932 )**

*[As in force on the 1st March 1998]*

संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन, मुंबई ४०० ००४ यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

२००७

**[ किंमत : रु. १९.०० ]**

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १ मार्च, १९९८ रोजी यथाविद्यमान असलेला दि इंडियन पार्टनरशिप ॲक्ट, १९३२ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र,** असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड ९, अंक २, दिनांक १५ ऑक्टोबर, १९९८ यात पृष्ठे १०१ ते ११५ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक १५ ऑक्टोबर १९९८.

**डॉ. रघबीर सिंग,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Indian Partnership Act, 1932 as on the 1st March, 1998 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India,* Extraordinary Part XII, Section 1, No. 2, Vol. 9, dated 15st October, 1998 on pages 101 to 115.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,

Dated 15th October 1998.

Dr. RAGHBIR SINGH,

Secretary to the Government of India.

## विशोधन अधिनियम व अनुकूलन आदेश यांची सूची

१. निरसन व विशोधन अधिनियम, १९३४ (१९३४ चा २४).

२. विधि अनुकूलन आदेश, १९३७.

३. निरसन अधिनियम, १९३८ (१९३८ चा १).

४. विधि अनुकूलन आदेश, १९४८.

५. विधि अनुकूलन आदेश, १९५०.

६. भाग ख राज्य (विधि) अधिनियम, १९५१ (१९५१ चा ३).

७. विधि अनुकूलन आदेश, १९५७.

८. विधि अनुकूलन आदेश, १९६०.

९. १९८३ चा (विशोधन) अधिनियम, २०.

# भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२

## कलमांचा क्रम

## प्रकरण पहिले

### प्रारंभिक

कलमे

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.
२. व्याख्या.
३. १८७२ चा अधिनियम ९ याचे उपबंध लागू करणे.

## प्रकरण दुसरे

### भागीदारीचे स्वरूप

४. "भागीदार", "भागीदारी", "पेढी" व "पेढीचे नाव" यांची व्याख्या.
५. भागीदारी स्थानामुळे निर्माण होत नाही.
६. भागीदारीचे अस्तित्व ठरवण्याची पद्धत.
७. इच्छाधीन भागीदारी.
८. विशिष्ट भागीदारी.

## प्रकरण तिसरे

### भागीदारांचे एकमेकांशी संबंध

९. भागीदारांची सर्वसाधारण कर्तव्ये.
१०. कपटामुळे झालेल्या तोट्याबद्दल हानिरक्षण करण्याचे कर्तव्य.
११. भागीदारांचे अधिकार व कर्तव्ये भागीदारांमधील संविदेद्वारे ठरवणे.
व्यापारनिरोधी करार.
१२. धंद्याचे चालन.
१३. अन्योन्य अधिकार व दायित्वे.
१४. पेढीची संपत्ती.
१५. पेढीच्या संपत्तीचे उपयोजन.
१६. भागीदारांनी अर्जित केलेला व्यक्तिगत नफा.
१७. भागीदारांचे अधिकार व कर्तव्ये.
पेढीमधील बदलानंतर.
पेढीचा अवधी संपल्यानंतर.
अतिरिक्त उपक्रम पार पाडले असतील तर.

## प्रकरण चौथे

### भागीदारांचे त्रयस्थ पक्षांशी संबंध

१८. भागीदार पेढीचा अभिकर्ता असणे.
१९. पेढीचा अभिकर्ता म्हणून भागीदाराचा उपलक्षित प्राधिकार.
२०. भागीदाराचा उपलक्षित प्राधिकार विस्तृत करणे व त्यावर निर्बंध घालणे.
२१. आणीबाणीच्या प्रसंगी भागीदाराचा प्राधिकार.
२२. पेढीला बद्ध करण्याकरता कृती करण्याची पद्धत.
२३. भागीदारांच्या कबुलीचा परिणाम.
२४. कार्यकारी भागीदाराला मिळणाऱ्या दखलीचा परिणाम.
२५. पेढीच्या कृतीबद्दल भागीदारांचे दायित्व.
२६. भागीदाराच्या गैर कृतीबद्दल पेढीचे दायित्व.
२७. भागीदारांनी केलेल्या दुरुपयोजनाबद्दल पेढीचे दायित्व.
२८. अभिवेदन.
२९. भागीदाराच्या हितसंबंधाच्या हस्तांतरितीचे अधिकार.
३०. भागीदारीतील लाभार्थ समावेशित अज्ञान व्यक्ती.

## प्रकरण पाचवे

### प्रवेशी व निर्गामी भागीदार


३१. भागीदाराला प्रविष्ट करणे.
३२. भागीदाराची निवृत्ती.
३३. भागीदाराला काढून टाकणे.
३४. भागीदाराची दिवाळखोरी.
३५. मृत भागीदाराच्या संपदेचे दायित्व.
३६. निर्गामी भागीदाराचे स्पर्धात्मक धंदा चालवण्याचे अधिकार.
व्यापारनिरोधी करार.
३७. विवक्षित बाबतीत निर्गामी भागीदाराचा नंतरच्या नफ्यात हिस्सा घेण्याचा अधिकार.
३८. पेढीमधील बदलामुळे चालत्या हमीचे प्रत्याहरण.


## प्रकरण सहावे

### पेढीचे विसर्जन


३९. पेढीचे विसर्जन.
४०. कराराद्वारे विसर्जन.
४१. अनिवार्य विसर्जन.
४२. संभावी विवक्षित घटना घडल्यावर विसर्जन.
४३. इच्छाधीन भागीदारीचे नोटिशीद्वारे विसर्जन.
४४. न्यायालयाकडून विसर्जन.
४५. भागीदारांनी विसर्जनानंतर केलेल्या कृतीबद्दल दायित्व.
४६. विसर्जनानंतर धंदा परिमापित करवून घेण्याचा भागीदारांचा अधिकार.
४७. परिसमापनाच्या प्रयोजनार्थ भागीदारांचा चालता प्राधिकार.
४८. भागीदारांमधील हिशेब चुकते करण्याची पद्धत.
४९. पेढीची ऋणे व वेगळी ऋणे यांची फेड.
५०. विसर्जनानंतर अर्जित केलेला व्यक्तिगत नफा.
५१. समयपूर्व विसर्जनानंतर, अधिमूल्य परत करणे.
५२. भागीदारीची संविदा कपट किंवा अपवेदन यामुळे विखंडित झाली असेल तेव्हाचे अधिकार.
५३. पेढीच्या नावाचा किंवा पेढीच्या संपत्तीचा वापर निरोधण्याचा अधिकार.
५४. व्यापारनिरोधी करार.
५५. विसर्जनानंतर ख्यातिस्वाची विक्री.
ख्यातिस्वाच्या क्रेत्याचे व विक्रेत्याचे अधिकार.
व्यापारनिरोधी करार.


## प्रकरण सातवे

### पेढ्यांची नोंदणी


५६. हे प्रकरण लागू होण्यापासून सूट देण्याची शक्ती.
५७. निबंधकांची नियुक्ती.
५८. नोंदणीसाठी अर्ज.
५९. नोंदणी.
६०. पेढीच्या नावातील आणि धंद्याच्या मुख्य जागेतील फेरबदल मंजूर करणे.
६१. शाखा बंद करणे व उघडणे यांचे टिप्पण.
६२. भागीदारांच्या नावांमधील व पत्त्यांमधील बदलांचे टिप्पण.
६३. पेढीमधील बदलांचे आणि तिच्या विसर्जनाचे वृत्त नमूद करणे.
अज्ञान व्यक्तीच्या निष्क्रमणाचे वृत्त नमूद करणे.

६४. चुकांची दुरूस्ती.
६५. न्यायालयाच्या आदेशाने नोंदणीवहीचे विशोधन.
६६. नोंदणीवही व दप्तरदाखल दस्तऐवज यांचे निरीक्षण.
६७. नकला देणे.
६८. पुराव्याचे नियम.
६९. नोंदणी न केल्याचा परिणाम.
७०. खोटा तपशील पुरवल्याबद्दल दंड.
७१. नियम करण्याची शक्ती.

## प्रकरण आठवे

### पूरक

७२. जाहीर नोटीस देण्याची पद्धत.
७३. निरसित.
७४. व्यावृत्ती.
**अनुसूची पहिली**
**अनुसूची दुसरी** (निरसित).
परिशिष्ट-महाराष्ट्र विशोधन अधिनियम.
शब्दसूची : इंग्रजी-मराठी
मराठी-इंग्रजी

## परिशिष्ट-महाराष्ट्र विशोधन अधिनियम

१. १९७३ चा महाराष्ट्र विशोधन अधिनियम क्रमांक २५.

२. १९८४ चा महाराष्ट्र विशोधन अधिनियम क्रमांक २८.

# भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२

## [ १९३२ चा अधिनियम क्रमांक ९ ][१]

(१ मार्च, १९९८ रोजी यथाविद्यमान)

[८ एप्रिल, १९३२]

**भागीदारीसंबंधीचा कायदा निश्चित व विशोधित करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी** भागीदारीसंबंधीचा कायदा निश्चित व विशोधित करणे समयोचित आहे ; **त्याअर्थी** याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

### प्रकरण पहिले

### प्रारंभिक

**संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

**१.** (१) या अधिनियमास " भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२ " असे म्हणता येईल.

[२][(२) त्याचा विस्तार [३][(जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून)] संपूर्ण भारतभर आहे.]

(३) तो १ ऑक्टोबर, १९३२ रोजी अंमलात येईल, मात्र ६९ ने कलम १ ऑक्टोबर, १९३३ रोजी अंमलात येईल.

**व्याख्या.**

**२.** या अधिनियमामध्ये विषय अगर संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसल्यास,—

(क) " पेढीची कृती " याचा अर्थ, जीमुळे, पेढीकडून किंवा तिच्याविरुद्ध बजावणीयोग्य अधिकार निर्माण होईल अशी पेढीच्या सर्व भागीदारांची किंवा तिच्या कोणत्याही भागीदाराची किंवा अभिकर्त्याची कोणतीही कृती किंवा अकृती, असा आहे ;

(ख) " धंदा " यात प्रत्येक उदीम, जीविका व पेशा यांचा समावेश आहे ;

(ग) " विहित " याचा अर्थ या अधिनियमाखाली केलेल्या नियमांनी विहित केलेले, असा आहे ;

(घ) " त्रयस्थ पक्ष " या शब्दाचा एखादी पेढी किंवा तीमधील भागीदार यांच्या संबंधात वापरलेला अर्थ, त्या पेढीमध्ये भागीदार नसलेली कोणतीही व्यक्ती, असा आहे ; आणि

(ङ) या अधिनियमात वापरलेल्या पण व्याख्या न केलेल्या आणि " भारतीय संविदा अधिनियम, १८७२ " (१८७२ चा ९) यामध्ये व्याख्या केलेल्या शब्दप्रयोगांना, त्या अधिनियमात ठरवून दिलेले अर्थ असतील.

**१८७२ चा अधिनियम ९ याचे उपबंध लागू करणे.**

**३.** " भारतीय संविदा अधिनियम, १८७२ " (१८७२ चा ९) चे अनिरसित उपबंध, या अधिनियमाच्या व्यक्त उपबंधाशी ते जेथवर विसंगत असतील तेवढे सोडून एरव्ही पेढ्यांना लागू राहतील.

### प्रकरण दुसरे

### भागीदारीचे स्वरूप

**" भागीदारी ", " भागीदार ", " पेढी " व " पेढीचे नाव " व यांची व्याख्या.**

**४.** " भागीदारी " म्हणजे ज्या व्यक्तीमध्ये त्यांच्यापैकी सर्वांकडून किंवा त्या सर्वांच्या वतीने कार्य करणाऱ्या कोणाहीकडून चालवल्या जाणाऱ्या धंद्याच्या नफ्यात हिस्सा घेण्याचा करार झाला असेल त्यांच्यामधील संबंध होय.

ज्या व्यक्तींनी एकमेकांशी भागीदारी केलेली असेल त्यांना व्यक्तिशः " भागीदार " व सामुदायिकरीत्या " पेढी " आणि ज्या नावाखाली त्यांचा धंदा चालवण्यात येतो त्यास " पेढीचे नाव " असे म्हणतात.

---

१. उद्देश व कारणे यांचे निवेदन व विशेष समिती अहवाल याकरिता, गॅझेट ऑफ इंडिया, १९३१, भाग ४, पृ. ३१ पहा; विशेष समितीच्या अहवालाकरिता गॅझेट ऑफ इंडिया, १९३२, भाग ४, पृ. १ पहा.

हा अधिनियम 'वऱ्हाड विधि अधिनियम, १९४१' (१९४१ चा ४) याद्वारे वऱ्हाडला लागू करण्यात आला.

हा अधिनियम, १९६३ चा विनियम ६, कलम २ व अनुसूची १ली याद्वारे दादरा व नगर हवेली येथे लागू करण्यात आला, १९६३ चा विनियम ७, कलम ३ व अनुसूची १ द्वारे पाँडेचरी येथे लागू करण्यात आला व १९६३ चा विनियम ११, कलम ३ व अनुसूचीद्वारे दीव, दमण व गोवा येथे लागू करण्यात आला.

हा अधिनियम, मद्रास येथे लागू करताना मद्रास विधि अनुकूलन (केंद्रीय अधिनियम) आदेश, १९५७ व १९५९ चा मद्रास अधिनियम, २१ द्वारे विशोधित करण्यात आला.

२. विधी अनुकूलन आदेश, १९५० द्वारे पूर्वीच्या पोटकलमाऐवजी (२६ जानेवारी, १९५० पासून) दाखल करण्यात आले.

३. १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूचीद्वारे " भाग ' ख ' राज्यांव्यतिरिक्त " या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

भागीदारी स्थानामुळे निर्माण होत नाही. ५. भागीदारीचा संबंध संविदेतून उद्‌भवतो, स्थानातून नव्हे, आणि, विशेषतः हिंदू अविभक्त कुटुंबातील घटक म्हणून कौटुंबिक धंदा चालवणाऱ्या व्यक्ती किंवा पति-पत्नी म्हणून धंदा चालवणारे ब्रम्ही, बौद्ध पति-पत्नी अशा धंद्यातील भागीदार होत नाहीत.

भागीदारीचे अस्तित्व ठरविण्याची पद्धत. ६. व्यक्तींचा एखादा समूह हा पेढी आहे किंवा नाही अथवा एखादी व्यक्ती पेढीमध्ये भागीदार आहे किंवा नाही, हे ठरवताना सर्व संबद्ध तथ्ये एकत्रित लक्षात घेतली असता त्यावरुन दिसून येणारा पक्षापक्षांमधील वास्तव संबंध विचारात घेतला जाईल.

**स्पष्टीकरण १.—**एखाद्या संपत्तीत संयुक्त किंवा सामाईक हितसंबंध धारण करणाऱ्या व्यक्तींनी त्या संपत्तीपासून मिळणाऱ्या नफ्यामध्ये किंवा ठोक प्राप्तीमध्ये हिस्सा घेणे एवढ्यानेच अशा व्यक्ती भागीदार बनत नाहीत.

**स्पष्टीकरण २.—**एखाद्या व्यक्तीला धंद्यातील नफ्याचा हिस्सा मिळणे अथवा धंद्यापासून नफा अर्जित होण्यावर अवलंबून असणारी किंवा त्यापासून अर्जित झालेल्या नफ्याबरोबर बदलणारी रक्कम मिळणे एवढ्यानेच तो धंदा चालवणाऱ्या व्यक्तींच्याबरोबर ती भागीदार बनत नाही ;

आणि विशेषतः, असा हिस्सा किंवा अशी रक्कम,—

(क) कोणत्याही धंद्यात शिरलेल्या किंवा शिरू पाहणाऱ्या व्यक्तींना पैसे कर्जाऊ देणाऱ्याला,

(ख) पारिश्रमिक म्हणून एखाद्या नोकराला किंवा अभिकर्त्याला,

(ग) वार्षिकी म्हणून मृत भागीदाराच्या विधवेला किंवा अपत्याला, अथवा,

(घ) धंद्याच्या ख्यातिस्वाच्या किंवा त्यातील हिश्श्याच्या विक्रीचे प्रतिफल म्हणून धंद्याच्या पूर्व मालकाला किंवा अंश मालकाला,

मिळणे एवढ्यानेच ते मिळणारी व्यक्ती धंदा चालवणाऱ्या व्यक्तींबरोबर भागीदार होत नाही.

इच्छाधीन भागीदारी. ७. जेव्हा भागीदारांच्या भागीदारीच्या कालावधीबाबत किंवा त्यांच्या भागीदारीच्या समाप्तीबाबत त्यांच्यामधील संविदेने कोणताही उपबंध केलेला नसतो तेव्हा, भागीदारी ही 'इच्छाधीन भागीदारी' असते.

विशिष्ट भागीदारी. ८. एखाद्या व्यक्तीला विशिष्ट प्रोद्यमांमध्ये किंवा उपक्रमांमध्ये दुसऱ्या व्यक्तीबरोबर भागीदार होता येईल.

## प्रकरण तिसरे

## भागीदारांचे एकमेकांशी संबंध

भागीदारांची सर्वसाधारण कर्तव्ये. ९. जास्तीत जास्त सामाईक लाभार्थ पेढीचा धंदा चालवण्यास, एकमेकांशी न्यायाने व इमानदारीने वागण्यास, आणि कोणत्याही भागीदाराला किंवा त्याच्या वैध प्रतिनिधीला खरे हिशेब व पेढीवर परिणाम करणाऱ्या सर्व गोष्टींविषयी संपूर्ण माहिती देण्यास भागीदार बांधलेले आहेत.

कपटामुळे झालेल्या तोट्याबद्दल हानिरक्षण करण्याचे कर्तव्य. १०. प्रत्येक भागीदार पेढीच्या धंद्याचे चालन करताना आपल्या कपटामुळे तिला आलेल्या कोणत्याही तोट्याबद्दल पेढीचे हानिरक्षण करील.

भागीदारांचे अधिकार व कर्तव्ये भागीदारांमधील संविदेद्वारे ठरवणे. ११. (१) या अधिनियमाच्या उपबंधाच्या अधीनतेने, पेढीच्या भागीदारांचे अन्योन्य अधिकार व कर्तव्ये भागीदारांमधील संविदेद्वारे ठरवता येईल, आणि अशी संविदा, व्यक्त असू शकेल किंवा व्यवहारक्रमाने उपलक्षित होऊ शकेल.

अशा संविदेत सर्व भागीदारांच्या संमतीने फेरबदल करता येईल आणि अशी संमती व्यक्त असू शकेल किंवा व्यवहारक्रमाने उपलक्षित होऊ शकेल.

व्यापारविरोधी करार. (२) ' भारतीय संविदा अधिनियम, १८७२ ' (१८७२ चा ९) कलम २७ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, भागीदार हा भागीदार असताना त्या पेढीच्या धंद्याव्यतिरिक्त अन्य कोणताही धंदा चालवणार नाही असा उपबंध अशा संविदांमध्ये करता येईल.

धंद्याचे चालन. १२. भागीदारांमधील संविदेच्या अधीनतेने,—

(क) प्रत्येक भागीदाराला धंद्याच्या चालनात भाग घेण्याचा अधिकार आहे ;

(ख) प्रत्येक भागीदार धंद्याचे चालन करताना आपली कर्तव्ये तत्परतेने पार पाडण्यास बांधलेला आहे ;

(ग) धंद्याशी संबंधित असलेल्या सर्वसामान्य बाबींविषयी कोणताही मतभेद उद्‌भवल्यास त्यावर भागीदारींच्या बहुमताने निर्णय घेता येईल आणि ती बाब निर्णीत होण्यापूर्वी प्रत्येकाला आपले मत

व्यक्त करण्याचा अधिकार असेल, पण सर्व भागीदारांच्या संमतीशिवाय धंद्याच्या स्वरूपात कोणताही बदल करता येणार नाही ; आणि

(घ) प्रत्येक भागीदाराला पेढीच्या पुस्तकांपैकी कोणतेही पुस्तक उपलब्ध होण्याचा, त्यांचे निरीक्षण करण्याचा व ते नक्कलण्याचा अधिकार आहे ;

**अन्योन्य अधिकार व दायित्वे.**

**१३.** भागीदारांमधील संविदेच्या अधीनतेने,—

(क) धंद्याच्या चालनात भाग घेतल्याबद्दल भागीदार पारिश्रमिक मिळण्याला हक्कदार नसतो ;

(ख) भागीदार अर्जित नफ्यात समसमान हिस्से घेण्याला हक्कदार असतात आणि ते पेढीला पोचलेल्या तोट्याप्रत समसमान अंशदान करतील ;

(ग) जेव्हा भागीदार त्याने अधिदान केलेल्या भांडवलावरील व्याजाला हक्कदार असेल तेव्हा, असे व्याज फक्त नफ्यामधून देता येईल ;

(घ) भागीदाराने अधिदान करण्याचा करार केलेल्या भांडवल-रकमेव्यतिरिक्त धंद्याच्या प्रयोजनांसाठी त्याने कोणतीही रक्कम पुरवल्यास किंवा कर्जाऊ दिल्यास तीवर दरसाल दर शेकडा ६ दराने व्याजाला तो हक्कदार असतो ;

(ङ) (एक) धंदा सर्वसामान्य रीतीने व योग्य प्रकारे चालवत असताना, आणि

(दोन) सर्वसामान्य व्यवहारदृष्टी असलेल्या व्यक्तीने आणीबाणीच्या प्रसंगी स्वतःच्या बाबतीत केली असता, अशी कृती सदृश परिस्थितीत पेढीला तोट्यापासून वाचवण्यासाठी करताना,

भागीदाराने खर्चिलेल्या रकमांबद्दल व त्याच्यावर ओढवलेल्या दायित्वांबद्दल पेढी त्याचे हानिरक्षण करील ; आणि

(च) पेढीच्या धंद्याचे चालन करताना भागीदाराच्या बुद्धीपुरस्सर हलगर्जीपणामुळे तिला आलेल्या कोणत्याही तोट्याबद्दल तो पेढीचे हानिरक्षण करील.

**पेढीची संपत्ती.**

**१४.** भागीदारांमधील संविदेच्या अधीनतेने, पेढीच्या संपत्तीमध्ये, पेढीच्या पुंजीत मुळात आणलेली अथवा पेढीने किंवा तिच्याकरिता किंवा पेढीच्या धंद्याच्या प्रयोजनांकरता आणि त्याच्या ओघात खरेदीद्वारे किंवा अन्यथा संपादिलेली सर्व संपत्ती आणि त्या संपत्तीतील अधिकार व हितसंबंध यांचा समावेश आहे, आणि धंद्याच्या ख्यातिस्वाचाही समावेश आहे.

विरुद्ध उद्देश दिसत नसल्यास, पेढीच्या सत्तेच्या पैशातून संपादिलेली संपत्ती आणि त्या संपत्तीतील अधिकार व हितसंबंध पेढीकरिता संपादिले आहेत असे मानले जाईल.

**पेढीच्या संपत्तीचे उपयोजन.**

**१५.** भागीदारींमधील संविदेच्या अधीनतेने, पेढीची संपत्ती भागीदार केवळ धंद्याच्या प्रयोजनांकरता धारण करतील व उपयोजित करतील.

**भागीदारांनी अर्जित केलेला व्यक्तिगत नफा.**

**१६.** भागीदारांमधील संविदेच्या अधीनतेने,—

(क) जर भागीदाराने पेढीच्या कोणत्याही संव्यवहारापासून अथवा पेढीची संपत्ती किंवा पेढीचा धंद्यातील संबंध किंवा पेढीचे नाव यांचा उपयोग करून स्वतःसाठी कोणताही नफा मिळवला तर, त्याला त्या नफ्याचा हिशेब देऊन पेढीकडे त्याचा भरणा करावा लागेल.

(ख) जर भागीदाराने पेढीच्या धंद्याच्याच स्वरूपाचा व त्याच्याशी स्पर्धा करणारा धंदा केला तर, त्या धंद्यात त्याने केलेल्या सर्व नफ्याचा हिशेब देऊन पेढीकडे त्याचा भरणा करावा लागेल.

**भागीदारांचे अधिकार व कर्तव्ये.**

**१७.** भागीदारांमधील संविदेच्या अधीनतेने,—

**पेढीमधील बदलानंतर.**

(क) जर पेढीच्या घटनेमध्ये बदल घडून आला तर, पुनर्घटित पेढीतील भागीदारींचे अन्योन्य अधिकार व कर्तव्य ही, होईल तेथवर, बदल होण्याच्या निकटपूर्वी होती तीच राहतात ;

**पेढीची मुदत संपल्यानंतर.**

(ख) जर ठराविक मुदतीकरता घटित झालेल्या पेढीने ती मुदत संपल्यानंतर धंदा चालू ठेवला तर, भागीदारींचे अन्योन्य अधिकार व कर्तव्ये ही इच्छाधीन भागीदारीच्या अनुषंगिकाशी सुसंगत असतील तेथवर, ती मुदत संपण्यापूर्वी होती तीच राहतात ; आणि

**अतिरिक्त उपक्रम पार पाडले असतील तर.**

(ग) जर एक किंवा अधिक प्रोद्यम किंवा उपक्रम पार पाडण्याकरता घटित झालेल्या पेढीने तो अन्य प्रोद्यम किंवा उपक्रम पार पाडला तर, तो अन्य प्रोद्यम किंवा उपक्रम यांच्यासंबंधी भागीदारांचे अन्योन्य अधिकार व कर्तव्ये, मूळ प्रोद्यम किंवा उपक्रम यांच्यासंबंधी होती तीच राहतात.

## प्रकरण चौथे

## भागीदारांचे त्रयस्थ पक्षांशी संबंध

**भागीदार पेढीचा अभिकर्ता असणे.**

१८. या अधिनियमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, पेढीच्या धंद्याच्या प्रयोजनार्थ भागीदार पेढीचा अभिकर्ता होय.

**पेढीचा अभिकर्ता म्हणून भागीदाराचा उपलक्षित प्राधिकार.**

१९. (१) कलम २२ च्या उपबंधांच्या अधीनतेने, पेढी ज्या प्रकारचा धंदा चालवत असेल तो नेहमीच्या पद्धतीने चालविण्यासाठी भागीदाराने केलेल्या कृतीद्वारे पेढी बद्ध होते.

या कलमाने प्रदान पेढीला बद्ध करण्याच्या भागीदाराच्या प्राधिकारास त्याचा ' उपलक्षित प्राधिकार ' असे म्हणतात.

(२) कोणताही विरुद्ध व्यापारी परिपाठ किंवा रूढी यांच्या अभावी, भागीदारास त्याच्या उपलक्षित प्राधिकारामुळे—

(क) पेढीच्या धंद्यासंबंधीचा तंटा लवादाकडे सादर करण्याची,

(ख) पेढीच्या वतीने त्याच्या स्वतःच्या नावावर बँकेत खाते उघडण्याची,

(ग) पेढीची कोणतीही हक्कमागणी किंवा तिचा अंश याबाबत तडजोड करण्याची किंवा तो सोडून देण्याची,

(घ) पेढीच्या वतीने दाखल केलेला दावा किंवा कार्यवाही काढून घेण्याची,

(ङ) पेढीविरोधी दाव्यात किंवा कार्यवाहीत कोणतेही दायित्व कबूल करण्याची,

(च) पेढीच्या वतीने स्थावर संपत्ती संपादन करण्याची,

(छ) पेढीच्या सत्तेची स्थावर संपत्ती हस्तांतरित करण्याची, किंवा

(ज) पेढीच्या वतीने भागीदारी करण्याची,

— शक्ती प्रदान होत नाही.

**भागीदाराचा उपलक्षित प्राधिकार विस्तृत करणे व त्यावर निर्बंध घालणे.**

२०. पेढीमधील भागीदारांना भागीदारांमधील संविदेद्वारे कोणत्याही भागीदाराचा उपलक्षित प्राधिकार विस्तृत करता येईल किंवा त्यावर निर्बंध घालता येईल.

असा कोणताही निर्बंध असला तरी, भागीदार ज्या व्यक्तीबरोबर व्यवहार करत असेल तिला तो निर्बंध ज्ञात आहे अथवा तो भागीदार, भागीदार आहे हे ज्ञात नाही किंवा असा तिचा समज नाही असे नसेल तर, भागीदाराने पेढीच्या वतीने केलेल्या त्याच्या उपलक्षित प्राधिकारात येणाऱ्या कोणत्याही कृतीद्वारे पेढी बद्ध होईल.

**आणीबाणीच्या प्रसंगी भागीदाराचा प्राधिकार.**

२१. सर्वसामान्य व्यवहारदृष्टी असलेल्या व्यक्तीने आणीबाणीच्या प्रसंगी स्वतःच्या बाबतीत केल्या असत्या अशा सर्व कृती सदृश परिस्थितीत कार्य करताना पेढीला तोट्यापासून वाचवण्यासाठी करण्याचा भागीदाराला प्राधिकार असतो व अशा कृतीद्वारे पेढी बद्ध होते.

**पेढीला बद्ध करण्याकरता कृती करण्याची पद्धत.**

२२. पेढीला बद्ध करता यावे यासाठी, भागीदाराने किंवा अन्य व्यक्तीने पेढीच्या वतीने करावयाची कृती किंवा निष्पादित करावयाचा संलेख, पेढीच्या नावाने किंवा पेढीला बद्ध करण्याचा उद्देश व्यक्त किंवा उपलक्षित करणाऱ्या अन्य कोणत्याही पद्धतीने करण्यात किंवा निष्पादित करण्यात येईल.

**भागीदारांच्या कबुलीचा परिणाम.**

२३. पेढीच्या कारभारासंबंधी भागीदाराने दिलेली कबुली किंवा केलेले अभिवेदन हे धंद्याच्या सामान्य क्रमात केलेले असल्यास, तो पेढीविरुद्ध पुरावा होतो.

**कार्यकारी भागीदाराला मिळणाऱ्या दखलीचा परिणाम.**

२४. जो भागीदार पेढीच्या धंद्याचे काम नित्यंशः करतो, त्याला पेढीच्या कारभारासंबंधातील कोणत्याही बाबीविषयी मिळणारी दखलही त्या भागीदारांकडून किंवा त्याच्या संबंधीने पेढीविरुद्ध कपट केले गेले असल्यास, तेवढी बाब खेरीजकरून एरव्ही, पेढीला मिळालेली दखल प्रवर्तित होईल.

**पेढीच्या कृतीबद्दल भागीदारांचे दायित्व.**

२५. प्रत्येक भागीदार, तो भागीदार असताना करण्यात आलेल्या पेढीच्या सर्व कृतीबद्दल इतर सर्व भागीदारांसह संयुक्तपणे आणि स्वतंत्रपणेसुद्धा, दायी असतो.

**भागीदाराच्या गैर कृतीबद्दल पेढीचे दायित्व.**

२६. पेढीच्या धंद्याच्या सामान्य क्रमात किंवा आपल्या भागीदारांच्या प्राधिकारान्वये कार्य करणाऱ्या भागीदाराची गैरकृती किंवा अकृती यांमुळे कोणत्याही त्रयस्थ पक्षाला हानी किंवा क्षती पोचल्यास अथवा कोणताही दंड ओढवल्यास त्याबद्दल भागीदार दायी असेल तेवढ्या मर्यादेपर्यंत पेढी दायी असते.

२७. जेव्हा—

(क) आपल्या दृश्यमान प्राधिकारान्वये कार्य करीत असताना एखादा भागीदार त्रयस्थ पक्षाकडून पैसे किंवा संपत्ती स्वीकारतो आणि त्याचे दुरुपयोजन करतो तेव्हा, अथवा

**भागीदारांनी केलेल्या दुरुपयोजनाबद्दल पेढीचे दायित्व.**

(ख) पेढी आपल्या धंद्याच्या क्रमात त्रयस्थ पक्षाकडून पैसा किंवा संपत्ती स्वीकारते आणि पैसा किंवा संपत्ती पेढीच्या हवाली असताना भागीदारांपैकी कोणताही भागीदार त्यांचे दुरुपयोजन करतो तेव्हा, हानी भरून देण्यास पेढी दायी असते.

२८. (१) जो कोणी तोंडी अगर लेखी शब्दांनी किंवा वर्तणुकीने आपण पेढीमध्ये भागीदार असल्याचे अभिवेदन करतो अथवा आपल्याबद्दल तसे अभिवेदन जाणूनबुजून होऊ देतो तो, ज्या कोणी अशा कोणत्याही अभिवेदनाच्या भरवशावर पेढीला उधारी दिली असेल त्याला त्या पेढीमधील भागीदारी म्हणून दायी असतो— मग स्वत: भागीदार असल्याचे अभिवेदन करणाऱ्या किंवा तशाप्रकारे अभिवेदित झालेल्या व्यक्तीला, याप्रमाणे उधारी देणाऱ्या व्यक्तीपर्यंत ते अभिवेदन पोचले आहे, हे ज्ञात असो वा नसो.

**अभिवेदन.**

(२) जेव्हा भागीदाराच्या मृत्यूनंतर धंदा पेढीच्या जुन्या नावाने चालू ठेवण्यात आला असेल तेव्हा, पेढीने त्याच्या मृत्यूनंतर केलेल्या कोणत्याही कृतीबद्दल त्याचा वैध प्रतिनिधी किंवा त्याची संपदा, त्या नावाचा वापर किंवा त्याचा एक भाग म्हणून मृत भागीदाराच्या नावाचा वापर चालू ठेवण्यात आला एवढ्यानेच केवळ दायी होणार नाही.

२९. (१) भागीदाराने पेढीमधील आपल्या हितसंबंधाचे अबाधितपणे किंवा गहाणाद्वारे अथवा अशा हितसंबंधावर त्याने केलेल्या प्रभार निर्मितीद्वारे हस्तांतरण केल्यामुळे, हस्तांतरितीला पेढी चालू असताना धंद्याच्या चालनात ढवळाढवळ करण्याचा किंवा हिशेब मागण्याचा किंवा पेढीच्या पुस्तकाचे निरीक्षण करण्याचा हक्क मिळत नाही, पण हस्तांतरितीला हस्तांतरक भागीदाराचा केवळ नफ्यातील हिस्सा मिळण्याचाच हक्क मिळतो, आणि हस्तांतरितीला भागीदारांनी संमत केलेला नफ्याचा हिशेब स्वीकारावा लागेल.

**भागीदाराच्या हितसंबंधाच्या हस्तांतरितीचे अधिकार.**

(२) जर पेढी विसर्जित झाली, किंवा हस्तांतरक भागीदार हा भागीदार असण्याचे बंद झाले, तर, हस्तांतरिती राहिलेल्या भागीदारांच्या विरुद्ध, हस्तांतरक भागीदार पेढीच्या मत्तेतील ज्या हिश्श्याचा हक्कदार असेल तो मिळण्याला आणि तो हिस्सा विनिश्चित करण्याच्या प्रयोजनार्थ विसर्जनाच्या दिनांकापासून हिशेबास हक्कदार असतो.

३०. (१) एखादी व्यक्ती ज्या कायद्यास ती अधीन आहे त्यानुसार अज्ञान असेल तर, तिला पेढीत भागीदार होता येणार नाही, पण त्यावेळच्या सर्व भागीदारांच्या संमतीने तिला भागीदारीतील लाभार्थ समावेशित करता येईल.

**भागीदारीतील लाभार्थ समावेशित अज्ञान व्यक्ती.**

(२) अशा अज्ञान व्यक्तीला पेढीच्या संपत्तीतील व नफ्यातील संमत होईल असा हिश्श्याप्रत अधिकार असतो, आणि पेढीच्या हिशेबांपैकी कोणतेही हिशेब त्याला उपलब्ध होऊ शकतील, त्याचे निरीक्षण करता येईल व त्यांच्या नकला काढता येतील.

(३) अशा अज्ञान व्यक्तीचा हिस्सा पेढीच्या कृतीबद्दल दायी असतो, पण अशा कोणत्याही कृतीबद्दल अज्ञान व्यक्ती व्यक्तिश: दायी नसते.

(४) पेढीशी आपला संबंध तोडतानाची वेळ सोडून एरव्ही, पेढीच्या संपत्तीतील किंवा नफ्यातील आपल्या हिश्श्याच्या हिशेबासाठी किंवा वसुलीसाठी अशा अज्ञान व्यक्तीस भागीदारांवर दावा लावता येणार नाही आणि अशा अपवादात्मक बाबतीत शक्यतोवर कलम ४८ मध्ये अंतर्भूत असलेल्या नियमांनुसार मूल्यांकन करून तिच्या हिश्श्याची रक्कम ठरवली जाईल :

परंतु, सर्व भागीदारांना एकत्रित कृतीने किंवा अन्य भागीदारांना नोटीस देऊन पेढी विसर्जित करण्याला हक्कदार असलेल्या कोणत्याही भागीदाराला अशा दाव्यात पेढी विसर्जित करण्याचे ठरवता येईल आणि तदनंतर न्यायालय विसर्जनाकरता व भागीदारांमधील हिशेब नक्की करण्याकरता म्हणून दावा पुढे चालवील, आणि अज्ञान व्यक्तीच्या हिश्श्याची रक्कम भागीदारांच्या हिश्श्यांबरोबर ठरवली जाईल.

(५) ज्या दिनांकास अशा व्यक्तीस सज्ञानता प्राप्त होईल किंवा ज्या दिनांकास ती भागीदारीतील लाभार्थ समावेशित झाली आहे ही माहिती तिला मिळेल त्यापैकी नंतरच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत कोणत्याही वेळी ती आपण पेढीमधील भागीदार होण्याचे ठरविले आहे किंवा न होण्याचे ठरविले आहे अशी जाहीर नोटीस देऊ शकेल आणि अशा नोटिशीमुळे पेढीसंबंधी तिचे स्थान निर्धारित होईल :

परंतु, जर तिनें अशी नोटीस दिली नाही तर, उक्त सहा महिने संपल्यावर ती पेढीमध्ये भागीदार होईल.

(६) जर अज्ञान म्हणून कोणत्याही व्यक्तीला पेढीमधील भागीदारीतील लाभार्थ समावेशित केले असेल तर, त्या व्यक्तीस सज्ञानता प्राप्त झाल्यापासून सहा महिने संपल्यानंतर विशिष्ट दिनांकापर्यंत अशा व्यक्तीला अशा समावेशनाची वार्ता नव्हती असे प्रपादन करणाऱ्या व्यक्तींवर ते तथ्य सिद्ध करण्याचा भार असेल.

(७) जेव्हा अशी व्यक्ती भागीदार होते तेव्हा,—

(क्) अज्ञान म्हणून तिचे अधिकार व दायित्वे, ती भागीदार होते त्या दिनांकापर्यंत चालू राहतात, पण ती भागीदारीतील लाभार्थ समावेशित झाल्यापासून करण्यात आलेल्या पेढीच्या सर्व कृतींबद्दल त्रयस्थ पक्षांना व्यक्तिशः सुद्धा दायी होते, आणि

(ख्) पेढीच्या संपत्तीतील व नफ्यातील तिचा हिस्सा म्हणजे ती अज्ञान म्हणून ज्याची हक्कदार होती तो हिस्सा असेल.

(८) जर अशा व्यक्तीने भागीदार न होण्याचे ठरवले तर—

(क्) ती जाहीर नोटीस देईल त्या दिनांकापर्यंत, या कलमाखालील अज्ञान व्यक्तीचे अधिकार व दायित्वे तिला असणे चालू राहील,

(ख्) तिचा हिस्सा नोटिशीच्या दिनांकानंतर करण्यात आलेल्या कोणत्याही कृतींबद्दल दायी असणार नाही, आणि

(ग्) संपत्तीतील व नफ्यातील आपल्या हिश्श्याकरता पोटकलम (४) अनुसार भागीदारांवर दावा लावण्याला ती हक्कदार असेल,

(९) पोटकलमे (७) व (८) मधील कोणत्याही गोष्टीमुळे कलम २८ च्या उपबंधांवर परिणाम होणार नाही.

## प्रकरण पाचवे

## प्रवेशी व निर्गामी भागीदार

भागीदाराला प्रविष्ट करणे.

**३१.** (१) भागीदारांमधील संविदा व कलम ३० चे उपबंध यांच्या अधीनतेने, सर्व विद्यमान भागीदारांच्या संमतीशिवाय कोणत्याही व्यक्तीला भागीदार म्हणून पेढीमध्ये प्रविष्ट केले जाणार नाही.

(२) कलम ३० च्या उपबंधाच्या अधीनतेने, जी व्यक्ती पेढीमध्ये भागीदार म्हणून प्रविष्ट करण्यात आली असेल ती त्यामुळे, ती भागीदार होण्यापूर्वी करण्यात आलेल्या पेढीच्या कोणत्याही कृतीबद्दल दायी होत नाही.

भागीदाराची निवृत्ती.

**३२.** (१) भागीदाराला—

(क्) इतर सर्व भागीदारांच्या संमतीने,

(ख्) भागीदारांनी केलेल्या व्यक्त करारानुसार, किंवा

(ग्) भागीदारी इच्छाधीन असेल तर, निवृत्त होण्याच्या आपल्या उद्देशाची इतर सर्व भागीदारींना लेखी नोटीस देऊन,

निवृत्त होता येईल.

(२) निवृत्त होणाऱ्या भागीदाराला त्याच्या निवृत्तीपूर्वी करण्यात आलेल्या पेढीच्या कृतीबद्दल कोणत्याही त्रयस्थ पक्षाप्रत असलेल्या कोणत्याही दायित्वातून असा त्रयस्थ पक्ष व पुनर्घटित पेढीचे भागीदार यांच्याशी करार करून, त्याद्वारे मुक्त होता येईल आणि अशा त्रयस्थ पक्षास निवृत्तीची वार्ता मिळाल्यानंतर तो व पुनर्घटित पेढी यांच्यामधील व्यवहारक्रमाद्वारे असा करार उपलक्षित होऊ शकेल.

(३) भागीदाराची पेढीमधून निवृत्ती झाली तरीही, निवृत्तीपूर्वी केली असता, ती पेढीची कृती ठरली असती अशा, तो आणि भागीदार यांच्यापैकी कोणीही निवृत्तीची जाहीर नोटीस दिली जाईपर्यंत केलेल्या कोणत्याही कृतीबद्दल भागीदार म्हणून त्यांचे त्रयस्थ पक्षाप्रत असलेले दायित्व चालू राहते :

परंतु, निवृत्त भागीदार, तो भागीदार होता याची वार्ता नसताना पेढीबरोबर व्यवहार करणाऱ्या कोणत्याही त्रयस्थ पक्षाला दायी नसतो.

(४) पोटकलम (३) खालील नोटिसा निवृत्त भागीदार किंवा पुनर्घटित पेढीमधील कोणताही भागीदार देऊ शकेल.

भागीदाराला काढून टाकणे.

**३३.** (१) भागीदारांमधील संविदेद्वारे प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा सद्भावपूर्वक वापर केल्याशिवाय, भागीदारांचे कितीही बहुमत असले तरी, त्यायोगे भागीदाराला पेढीमधून काढून टाकता येणार नाही.

(२) कलम ३२ पोटकलमे (२), (३) व (४) यांचे उपबंध काढून टाकलेल्या भागीदारास तो जणू काही निवृत्त भागीदार असावा त्याप्रमाणे लागू होतील.

भागीदाराची दिवाळखोरी.

**३४.** (१) जेव्हा पेढीमधील भागीदार दिवाळखोर म्हणून अभिनिर्णीत झाला असेल तेव्हा अभिनिर्णीतीचा आदेश देण्यात आला त्या दिनांकास तो भागीदार असण्याचे बंद होते—मग त्यामुळे पेढी विसर्जित होवो वा न होवो.

(२) भागीदार दिवाळखोर म्हणून अभिनिर्णीत झाल्यामुळे भागीदारांमधील संविदेनुसार पेढी विसर्जित होत नसेल तर, अभिनिर्णीतीचा आदेश देण्यात आला त्या दिनांकानंतर करण्यात आलेल्या अशा पेढीच्या कोणत्याही कृतीबद्दल अशाप्रकारे अभिनिर्णीत झालेल्या भागीदाराची संपदा दायी नसते आणि दिवाळखोराच्या कोणत्याही कृतीबद्दल पेढी दायी नसते.

**३५.** जर भागीदाराच्या मृत्यूमुळे भागीदारांमधील संविदेनुसार पेढी विसर्जित होत नसेल तर, मृत भागीदारांची संपदा त्याच्या मृत्यूनंतर करण्यात आलेल्या पेढीच्या कोणत्याही कृतीबद्दल दायी नसते. **मृत भागीदाराच्या संपदेचे दायित्व.**

**३६.** (१) निर्गामी भागीदाराला पेढीच्या धंद्याशी स्पर्धा करणारा धंदा चालविता येईल आणि त्याला अशा धंद्याची जाहिरात करता येईल. पण, विरुद्ध संविदेच्या अधीनतेने, त्याला— **निर्गामी भागीदाराचे स्पर्धात्मक धंदा चालवण्याचे अधिकार.**

(क) पेढीचे नाव वापरता येणार नाही,

(ख) आपण पेढीचा धंदा चालवत असल्याचे अभिवेदन करता येणार नाही, किंवा

(ग) त्याचे भागीदार असणे बंद होण्यापूर्वी ज्या व्यक्ती पेढीशी व्यवहार करीत होत्या त्यांच्या गिऱ्हाईकीसाठी प्रयत्न करता येणार नाही.

(२) भागीदार असणे बंद झाल्यावर विनिर्दिष्ट अवधीपर्यंत किंवा विनिर्दिष्ट स्थानिक सीमांच्या आत पेढीच्या धंद्यासारखा कोणताही धंदा आपण चालवणार नाही असा करार भागीदारांस आपल्या भागीदारांबरोबर करता येईल, आणि ' भारतीय संविदा अधिनियम, १८७२ ' (१८७२ चा ९) याच्या २७ व्या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी घातलेले निर्बंध वाजवी असल्यास असा करार विधिग्राह्य असेल. **व्यापारनिरोधी करार.**

**३७.** जर पेढीचा कोणताही सदस्य मरण पावलेला असेल किंवा तो भागीदार असणे अन्यथा बंद झालेला असेल आणि उत्तरजीवी किंवा चालू राहिलेल्या भागीदारांनी, ते व निर्गामी भागीदार किंवा त्याची संपदा यांच्यामधील हिशेबांची कोणतीही अंतिम निश्चिती झालेली नसताना, पेढीच्या संपत्तीनिशी तिचा धंदा चालवला असेल तर, विरुद्ध संविदेच्या अभावी, निर्गामी भागीदार, भागीदार असणे बंद झाल्यापासून केलेल्या नफ्याचा जेवढा हिस्सा पेढीच्या संपत्तीतील त्याच्या हिश्श्याच्या उपयोगाशी संबंधनीय असेल अशा हिश्श्याला किंवा पेढीच्या संपत्तीतील त्याच्या हिश्श्याच्या रकमेवर दर साल दर शेकडा ६ दराने व्याजाला तो किंवा त्याची संपदा स्वत:च्या, किंवा आपल्या प्रतिनिधींच्या विकल्पानुसार हक्कदार असतात : **विवक्षित बाबतीत निर्गामी भागीदाराचा नंतरच्या नफ्यात हिस्सा घेण्याचा अधिकार.**

परंतु, जर भागीदारांमधील संविदेद्वारे उत्तरजीवी किंवा चालू राहिलेल्या भागीदारास मृत किंवा निर्गामी भागीदाराचा हितसंबंध खरेदी करण्याचा विकल्पाधिकार देण्यात आला असेल आणि तो विकल्पाधिकार रीतसर वापरलेला असेल तर, प्रकरणपरत्वे, मृत भागीदारांची संपदा किंवा निर्गामी भागीदार किंवा त्याची संपदा नफ्याच्या आणखी किंवा अन्य कोणत्याही हिश्श्याला हक्कदार नसतात, पण विकल्पाधिकाराचा वापर करण्याचा आव आणूनही एखाद्या भागीदाराने जर सर्व महत्त्वाच्या बाबतीत संविदेच्या अटींचे अनुपालन केले नाही तर, या कलमाच्या पूर्वगामी उपबंधाखाली हिशेब देण्याला तो दायी असतो.

**३८.** पेढीला किंवा पेढीच्या संव्यवहारांबाबत त्रयस्थ पक्षाला दिलेली चालती हमी, विरुद्ध कराराच्या अभावी, पेढीच्या घटनेत कोणताही बदल झाल्याच्या दिनांकापासून भावी संव्यवहारांपुरती प्रत्याहृत होते. **पेढीमधील बदलामुळे चालत्या हमीचे प्रत्याहरण.**

## प्रकरण सहावे

## पेढीचे विसर्जन

**३९.** पेढीच्या सर्व भागीदारांमधील भागीदारीच्या विसर्जनास ' पेढीचे विसर्जन ' असे म्हणतात. **पेढीचे विसर्जन.**

**४०.** सर्व भागीदारांच्या संमतीने किंवा भागीदारांमधील संविदेनुसार पेढी विसर्जित करता येईल. **कराराद्वारे विसर्जन.**

**४१.** (क) सर्व भागीदार किंवा एक सोडून इतर सर्व भागीदार दिवाळखोर म्हणून अभिनिर्णीत झाल्याने, किंवा **अनिवार्य विसर्जन.**

(ख) पेढीचा धंदा चालवला जाणे किंवा भागीदारांनी तो भागीदारीमध्ये चालू ठेवणे ज्यायोगे बेकायदेशीर होईल, अशी कोणतीही घटना घडल्याने,

पेढी विसर्जित होते :

परंतु, जर पेढीने एकापेक्षा अधिक वेगवेगळे प्रोद्यम किंवा उपक्रम चालवले असतील तर, एका किंवा अधिक प्रोद्यमांची किंवा उपक्रमांची केवळ अवैधता पेढीचे वैध प्रोद्यम आणि उपक्रम यांच्यासंबंधी तिचे विसर्जन होण्यास कारणीभूत ठरणार नाही.

**४२.** भागीदारांमधील संविदेच्या अधीनतेने,— **संभावी विवक्षित घटना घडल्यानंतर विसर्जन.**

(क) पेढी ठराविक मुदतीकरता घटित झालेली असेल तर ती मुदत संपल्यामुळे ;

(ख) एका किंवा अधिक प्रोद्यम किंवा उपक्रम पार पाडण्यासाठी पेढी घटित झालेली असेल तर त्यांच्या परिपूर्तीमुळे ;

(ग) भागीदारांच्या मृत्यूमुळे ; आणि

(घ) भागीदारांची दिवाळखोर म्हणून अभिनिर्णीती झाल्यामुळे,

पेढी विसर्जित होईल.

इच्छाधीन भागीदारीचे नोटिशीद्वारे विसर्जन.

४३. (१) जेव्हा भागीदारी इच्छाधीन असेल तेव्हा कोणताही भागीदार पेढी विसर्जित करण्याच्या आपल्या उद्देशाची इतर सर्व भागीदारांना लेखी नोटीस देऊन पेढी विसर्जित करू शकेल.

(२) नोटिशीत विसर्जनाचा दिनांक म्हणून नमूद केलेल्या दिनांकापासून किंवा अशा प्रकारे कोणताही दिनांक नमूद केला नसेल तर ती नोटीस विदित करण्यात आल्याच्या दिनांकापसून पेढी विसर्जित होते.

न्यायालयाकडून विसर्जन.

४४. भागीदाराने लावलेल्या दाव्यात न्यायालयाला पुढीलपैकी कोणत्याही कारणावरून पेढी विसर्जित करता येईल, ती कारणे अशी :—

(क) भागीदार मनाने विकल झालेला आहे, -- याबाबतीत अन्य कोणत्याही भागीदाराला, तसेच मनाने विकल झालेल्या भागीदाराच्या इष्टमित्रालाही दावा लावता येईल ;

(ख) दावा लावणाऱ्या भागीदाराहून अन्य भागीदार हा भागीदार म्हणून आपल्या कर्तव्याचे पालन करण्यास कोणत्याही प्रकारे कायमचा असमर्थ झालेला आहे ;

(ग) दावा लावणाऱ्या भागीदाराहून अन्य भागीदार, धंद्याचे स्वरूप विचारात घेता, धंदा चालवण्यावर ज्यामुळे बाधक परिणाम होण्याचा संभव आहे अशा वर्तनाबद्दल दोषी आहे ;

(घ) दावा लावणाऱ्या भागीदाराहून अन्य भागीदार पेढीच्या कारभाराचे व्यवस्थापन किंवा तिच्या धंद्याचे चालन यासंबंधीच्या करारांचा बुद्धिपुरस्सर किंवा हेकेखोरपणाने भंग करीत आहे किंवा धंद्यासंबंधीच्या बाबींमध्ये अन्यथा असे वर्तन करीत आहे की, ज्यामुळे अन्य भागीदारांना त्याच्याबरोबर भागीदारीत तो धंदा चालवणे वाजवीरीत्या व्यवहार्य नाही ;

(ङ) दावा लावणाऱ्या भागीदाराहून अन्य भागीदाराने आपला पेढीतील संपूर्ण हितसंबंध त्रयस्थ पक्षास कोणत्याही प्रकारे हस्तांतरित केला आहे किंवा त्याने ' दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ '(१९०८ चा ५) पहिली अनुसूची, ' ऑर्डर २१, ' नियम ४९ च्या उपबंधाखाली आपला हिस्सा प्रभारित होऊ दिला आहे किंवा त्या भागीदारांकडून देय असलेल्या जमीन-महसुलाची थकबाकी किंवा जमीन-महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसुलीयोग्य असलेली कोणतीही देणी यांच्या वसुलीकरता तो विकू दिला आहे ;

(च) पेढीचा धंदा तोटा येऊ न देता चालवणे शक्य नाही ; किंवा

(छ) पेढी विसर्जित करावी हे ज्यामुळे न्याय्य आणि समन्यायी ठरेल अशी अन्य कोणतीही कारणे.

भागीदारांनी विसर्जनानंतर, केलेल्या कृतीबद्दल दायित्व.

४५. (१) पेढी विसर्जित झाली तरीही, विसर्जनापूर्वी केली असता जी पेढीची कृती ठरली असती अशा, भागीदारांपैकी कोणीही विसर्जनाची जाहीर नोटीस दिली जाईपर्यंत, केलेल्या कोणत्याही कृतीबद्दल भागीदार म्हणून त्यांचे त्रयस्थ पक्षांप्रत दायित्व चालू राहते :

परंतु, जो भागीदार मरण पावतो किंवा दिवाळखोर म्हणून अभिनिर्णीत होता, किंवा जो भागीदार त्या पेढीशी व्यवहार करणाऱ्या व्यक्तीला तो भागीदार असल्याचे ज्ञात नसताना पेढीमधून निवृत्त होतो त्याची संपदा ज्या दिनांकास तो भागीदार असणे थांबले त्यानंतर करण्यात आलेल्या कृतीबद्दल या कलमाखाली दायी होत नाही.

(२) पोटकलम (१) खालील नोटिसा कोणताही भागीदार देऊ शकेल.

विसर्जनानंतर धंदा परिमापित करवून घेण्याचा भागीदारांचा अधिकार.

४६. पेढीचे विसर्जन झाल्यावर प्रत्येक भागीदार किंवा त्याचा प्रतिनिधी इतर सर्व भागीदारांच्या किंवा त्यांच्या प्रतिनिधींच्या विरुद्ध, पेढीची ऋणे आणि दायित्वे यांच्या फेडीसाठी पेढीची संपत्ती उपयोजित करवून घेण्याला आणि राहिलेला वाढावा भागीदार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांच्यामध्ये त्यांच्या अधिकारांनुसार वितरित करवून घेण्याला हक्कदार असतो.

परिसमापनाच्या प्रयोजनार्थ भागीदारांचा चालता प्राधिकार.

४७. पेढीच्या विसर्जनानंतर, प्रत्येक भागीदाराच्या पेढीला बद्ध करण्याच्या प्राधिकार आणि भागीदारांचे इतर अन्योन्य अधिकार व आबंधने, विसर्जन झाले असले तरीही, पेढीचा कारभार परिसमापित करण्यासाठी आणि सुरू केलेले पण विसर्जनाच्या वेळी अपूर्ण राहिलेले संव्यवहार पूर्ण करण्यासाठी आवश्यक असेल तेथवर चालू राहतात, पण अन्यथा नाहीत :

परंतु, ज्यास दिवाळखोर म्हणून अभिनिर्णीत करण्यात आले असेल त्या भागीदाराच्या कृतींनी पेढी काही झाले तरी बद्ध होत नाही, परंतु हे परंतुक अभिनिर्णीतीनंतर जिने आपण त्या दिवाळखोर व्यक्तीचा भागीदार असल्याचे अभिवेदन केले असेल किंवा जाणूनबुजून तसे अभिवेदन होऊ दिले असेल अशा कोणत्याही व्यक्तीच्या दायित्वावर परिणाम करत नाही.

भागीदारांमधील हिशेब चुकते करण्याची पद्धत.

४८. विसर्जनानंतर पेढीचे हिशेब चुकते करताना पुढील नियम, भागीदारांनी केलेल्या कराराच्या अधीनतेने, पाळले जातील :—

(क) प्रथम नफ्यातून, नंतर भांडवलातून आणि शेवटी, जरूर तर, भागीदार नफ्यात हिस्से घेण्याला जसे हक्कदार होते त्या प्रमाणात त्यांच्याकडून प्रत्येकशः भांडवलातील त्रुटींनी सुद्धा तोट्याची भरपाई केली जाईल ;

(ख) भांडवलातील त्रुटी भरून काढण्यासाठी भागीदारांनी अंशदान केलेल्या कोणत्याही रकमा यांसुद्धा पेढीची मत्ता पुढील रीतीने व क्रमाने उपयोजिली जाईल :—

(एक) पेढीची त्रयस्थ पक्षांप्रत देय असलेली ऋणे फेडण्यास ;

(दोन) पेढीकडून प्रत्येक भागीदारास भांडवलाहून भिन्न अशा उधारांबद्दल जे देय असेल त्याचा त्याला हिस्सेरशीने भरणा करण्यात ;

(तीन) प्रत्येक भागीदारास भांडवलाकारणे जे देय असेल त्याचा त्याला हिस्सेरशीने भरणा करण्यात ; आणि

(चार) काही अवशिष्ट राहिल्यास तो, भागीदार नफ्यात हिस्से घेण्याला जसे हक्कदार होते त्या प्रमाणात त्यांच्यामध्ये विभागला जाईल.

**पेढीची ऋणे व वेगळी ऋणे यांची फेड.**

**४९.** जेव्हा पेढीकडून संयुक्त ऋणे देय असतील आणि कोणत्याही भागीदाराकडून वेगळी ऋणेही देय असतील तेव्हा पेढीची संपत्ती पहिल्याप्रथम पेढीची ऋणे फेडण्यास आणि काही वाढावा राहिल्यास प्रत्येक भागीदाराचा हिस्सा त्याचे वेगळे ऋण फेडण्यासाठी उपयोजिला जाईल किंवा त्यास दिला जाईल. कोणत्याही भागीदाराची वेगळी संपत्ती प्रथम त्याची वेगळी ऋणे फेडण्यात आणि वाढावा (काही राहिल्यास) फेडीची ऋणे फेडण्यासाठी उपयोजिला जाईल.

**विसर्जनानंतर अर्जित केलेला व्यक्तिगत नफा.**

**५०.** एखाद्या भागीदाराच्या मृत्यूमुळे पेढी विसर्जित झाल्यानंतर आणि तिचा कारभार संपूर्णपणे परिसमापित होण्यापूर्वी कोणत्याही उत्तरजीवी भागीदाराने किंवा मृत भागीदाराच्या प्रतिनिधींनी हाती घेतलेल्या संव्यवहाराना, भागीदारीमधील संविदेच्या अधीनतेने, कलम १६, खंड (क) चे उपबंध लागू होतील :

परंतु, जेव्हा कोणत्याही भागीदाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने पेढीचे ख्यातिस्व विकत घेतलेले असेल तेव्हा, या कलमातील काहीही, पेढीचे नाव वापरण्याच्या त्यांच्या अधिकारावर परिणाम करणार नाही.

**समयपूर्व विसर्जनानंतर, अधिमूल्य परत करणे.**

**५१.** भागीदाराने ठराविक मुदतीपुरत्या भागीदारीत प्रवेश करताना अधिमूल्य दिलेले असून तो अवधी संपण्यापूर्वी एखाद्या भागीदाराच्या मृत्यूहून अन्य कारणाने पेढी विसर्जित झाली असेल त्या बाबतीत,---

(क) विसर्जन मुख्यत्त्वेकरुन त्याच्या स्वत:च्या गैरवर्तनामुळे झाले आहे, किंवा

(ख) अधिमूल्य किंवा त्याचा कोणताही भाग परत करण्याबद्दल कोणताही उपबंध अंतर्भूत नसलेल्या करारास अनुसरून विसर्जन झाले आहे,

असे नसेल तर, अधिमूल्य किंवा, तो ज्या अटींवर भागीदार झाला त्या अटी आणि तो ज्या काळात भागीदार होता त्याची दीर्घता लक्षात घेता वाजवी असेल असा त्या अधिमूल्याचा भाग परत मिळण्यास तो हक्कदार असेल.

**भागीदारीची संविदा कपट किंवा अपवेदन यामुळे विखंडित झाली असेल तेव्हाचे अधिकार.**

**५२.** जेव्हा भागीदारी निर्माण करणारी संविदा तिच्या पक्षांपैकी कोणाचेही कपट किंवा अपवेदन या कारणावरून विखंडित करण्यात आली असेल तेव्हा विखंडन करण्याला हक्कदार असलेला पक्ष, अन्य कोणत्याही अधिकारास बाध न येता,—

(क) पेढीमधील हिश्श्याच्या खरेदीसाठी त्याने दिलेल्या कोणत्याही रकमेदाखल आणि त्याने अंशदान केलेल्या कोणत्याही भांडवलादाखल, पेढीची ऋणे फेडल्यानंतर राहिलेला वाढावा किंवा पेढीची मत्ता यांवरील धारणाधिकाराला किंवा ती ठेवून घेण्याच्या अधिकाराला,

(ख) पेढीच्या ऋणांपोटी त्याने केलेल्या कोणत्याही भरण्याच्या संबंधी पेढीचा धनको म्हणून क्रमित होण्याला, आणि

(ग) कपट किंवा अपवेदन यांबद्दल दोषी असलेल्या भागीदाराकडून किंवा भागीदारांकडून पेढीच्या सर्व ऋणांविरुद्ध हानीरक्षित होण्याला,

हक्कदार असतो.

**पेढीच्या नावाचा किंवा पेढीच्या संपत्तीचा वापर निरोधण्याचा अधिकार.**

**५३.** पेढी विसर्जित झाल्यानंतर, प्रत्येक भागीदार किंवा त्याचा प्रतिनिधी, भागीदारांमधील विरुद्ध संविदेच्या अभावी, अन्य कोणत्याही भागीदारास किंवा त्याच्या प्रतिनिधीस पेढीचा कारभार संपूर्णपणे परिसमापित होईपर्यंत पेढीच्या नावाने सदृश धंदा चालविण्यापासून किंवा पेढीच्या संपत्तीपैकी काही संपत्ती त्याच्या स्वत:च्या लाभासाठी वापरण्यापासून निरोधू शकेल :

परंतु, जेव्हा कोणत्याही भागीदाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने पेढीचे ख्यातिस्व विकत असेल तेव्हा, पेढीचे नाव वापरण्याच्या त्याच्या अधिकारावर या कलमातील कोणत्याही गोष्टीचा परिणाम होणार नाही.

**व्यापारनिरोधी करार.**

**५४.** पेढीचे विसर्जन झाल्यावर किंवा त्याच्या पूर्वकल्पनेने भागीदारांना त्यांच्यापैकी काही किंवा सर्व भागीदार विनिर्दिष्ट कालावधीमध्ये किंवा विनिर्दिष्ट स्थानिक सीमांच्या आत पेढीच्या धंद्याशी सदृश असलेला धंदा करणार नाहीत असा करण्यात येईल आणि ' भारतीय संविदा अधिनियम, १८७२,' (१८७२ चा ९) कलम २७ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, घातलेले निर्बंध वाजवी असल्यास असा करार विधिग्राह्य असेल.

**विसर्जनानंतर ख्यातिस्वाची विक्री.** **५५.** (१) विसर्जनानंतर पेढीचे हिशेब चुकते करताना ख्यातिस्व, भागीदारांमधील संविदेच्या अधीनतेने, मत्तेमध्ये समाविष्ट करण्यात येईल आणि ते अलगपणे किंवा पेढीच्या इतर संपत्तीबरोबर विकता येईल.

**ख्यातिस्वाच्या क्रेत्याचे व विक्रेत्याचे अधिकार.** (२) विसर्जनानंतर पेढीचे ख्यातिस्व विकण्यात आले असेल त्या बाबतीत, भागीदारास क्रेत्याच्या धंद्याशी स्पर्धा करणारा धंदा चालवता येईल आणि अशा धंद्याची जाहिरात करता येईल, पण तो आणि क्रेता यांच्यामधील कराराच्या अधीनतेने, त्याला,—

(क) पेढीचे नाव वापरता येणार नाही,

(ख) आपण पेढीचा धंदा चालवत असल्याचे अभिवेदन करता येणार नाही, किंवा

(ग) पेढीच्या विसर्जनापूर्वी ज्या व्यक्ती तिच्याशी व्यवहार करत होत्या त्यांच्या गिऱ्हाईकीसाठी प्रयत्न करता येणार नाही.

**व्यापारनिरोधी करार.** (३) कोणत्याही भागीदारास, पेढीच्या ख्यातिस्वाची विक्री झाल्यावर विक्रेत्याबरोबर असा भागीदार विनिर्दिष्ट कालावधीमध्ये किंवा विनिर्दिष्ट स्थानिक सीमांच्या आत पेढीच्या धंद्याशी सदृश असा कोणताही धंदा चालवणार नाही असा करार करता येईल आणि 'भारतीय संविदा अधिनियम, १८७२,' (१८७२ चा ९) कलम २७ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, घातलेले निर्बंध वाजवी असल्यास असा करार विधिग्राह्य असेल.

## प्रकरण सातवे

## पेढ्यांची नोंदणी

**हे प्रकरण लागू होण्यापासून सूट देण्याची शक्ती.** **५६.** [1][कोणत्याही राज्याच्या राज्य शासनाला] [2][**शासकीय राजपत्रातील**] अधिसूचनेद्वारे, या प्रकरणाचे उपबंध त्या राज्यास किंवा अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या त्याच्या एखाद्या भागास लागू होणार नाहीत असे निदेशित करता येईल.

**निबंधकांची नियुक्ती.** **५७.** (१) राज्य शासनास या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी पेढी निबंधक नियुक्त करता येतील आणि ज्या क्षेत्रांमध्ये ते आपल्या शक्ती वापरणार आणि आपल्या कर्तव्यांचे पालन करणार ती निश्चित करता येतील.

(२) प्रत्येक निबंधक ' भारतीय दंड संहिता ' (१८६० चा ४५)-कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानले जाईल.

**नोंदणीसाठी अर्ज.** **५८.** (१) ज्या क्षेत्रात पेढीच्या धंद्याची कोणतीही जागा स्थित असेल किंवा करण्याचे योजलेले असेल त्याच्या निबंधकाकडे,—

(क) पेढीचे नाव,

(ख) पेढीच्या धंद्याची जागा किंवा मुख्य जागा,

(ग) पेढी जेथे धंदा चालवत असेल अशा अन्य कोणत्याही जागांची नावे,

(घ) प्रत्येक भागीदार पेढीमध्ये सामील झाल्याचा दिनांक,

(ङ) भागीदारांची संपूर्ण नावे आणि कायमचे पत्ते, आणि

(च) पेढीचा कालावधी,

हे विहित नमुन्यात निवेदणारे निवेदन विहित फी डाकेने पाठवून किंवा त्याच्याकडे सुपूर्द करून कोणत्याही वेळी पेढीची नोंदणी करून घेता येईल.

निवेदन सर्व भागीदारांकडून किंवा त्याबाबत विशेषत्वे प्राकृतिक करण्यात आलेल्या त्यांच्या अधिकर्त्यांकडून स्वाक्षरित केली जाईल.

(२) निवेदन स्वाक्षरित करणारी प्रत्येक व्यक्ती विहित रीतीने त्याचे सत्यापनही करील.

---

१. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे 'प्रांतिक सरकारला' याऐवजी हा शब्दोल्लेख घातला.

२. विधि अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे "गॅझेट ऑफ इंडिया" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(३) पेढीच्या नावात पुढीलपैकी कोणत्याही शब्दांचा, म्हणजे :—

"क्राऊन", "एम्परर", "एम्प्रेस", "एम्पायर", "इंपीरिअल", "किंग (राजा)", "क्वीन (राणी)", "रॉयल" या शब्दांचा अथवा [१][सरकारी] मंजुरी, मान्यता किंवा आश्रय ज्यांवरून व्यक्त होत असेल किंवा ज्यांनी उपलक्षित होत असेल त्या शब्दांचा, पेढीच्या नावाचा भाग म्हणून अशा शब्दांच्या वापरास [२][राज्य शासनाने] [३]* * * लेखी आदेशाद्वारे [४][आपली] संमती सूचित केली असल्याखेरीज, अंतर्भाव केला जाणार नाही.

**नोंदणी.**

**५९.** जेव्हा कलम ५८ मधील उपबंधाचे रीतसर अनुपालन झाले आहे याबाबत निबंधकाचे समाधान होईल तेव्हा, तो पेढी नोंदणीवही म्हणून संबोधल्या जाणाऱ्या नोंदणीवहीत निवेदनाची नोंद नमूद करील, आणि ते निवेदन दप्तरदाखल करील.

**पेढीच्या नावातील आणि धंद्याच्या मुख्य जागेतील फेरबदल मंजूर करणे.**

**६०.** (१) जेव्हा पेढीच्या नावात किंवा नोंदणीकृत पेढीच्या धंद्याच्या मुख्य जागेच्या ठिकाणांमध्ये फेरबदल करण्यात येईल तेव्हा तो फेरबदल विनिर्दिष्ट करणारे आणि कलम ५८ खाली आवश्यक केलेल्या रीतीने स्वाक्षरित व सत्यापित केलेले निवेदन विहित फीसह निबंधकाकडे पाठविण्यात येईल.

(२) जेव्हा पोटकलम (१) च्या उपबंधाने रीतसर अनुपालन झाले आहे याबाबत निबंधकाचे समाधान होईल तेव्हा, तो पेढी-नोंदणीवहीतील पेढीसंबंधीची नोंद त्या निवेदनानुसार विशोधित करील, आणि ती कलम ५९ खाली दप्तरदाखल करण्यात आलेल्या पेढीविषयक निवेदनासोबत दप्तरदाखल करील.

**शाखा बंद करणे व उघडणे यांचे टिप्पण.**

**६१.** जेव्हा नोंदलेली पेढी तिच्या धंद्याची मुख्य जागा नसलेल्या अशा कोणत्याही जागेतील धंदा बंद करील किंवा अशा कोणत्याही जागेत धंदा चालवण्यास सुरूवात करील तेव्हा, पेढीचा कोणताही भागीदार किंवा अभिकर्ता निबंधकास त्याची खबर देऊ शकेल आणि त्यानंतर निबंधक पेढी नोंदणीवहीतील पेढीविषयक नोंदीमध्ये निबंधक अशा खबरीचे टिप्पण करील आणि ती खबर कलम ५९ खाली दप्तरदाखल करण्यात आलेल्या पेढीविषयक निवेदनासोबत दप्तरदाखल करील.

**भागीदारांच्या नावांमधील व पत्त्यांमधील बदलांचे टिप्पण.**

**६२.** जेव्हा नोंदलेल्या पेढीमधील कोणताही भागीदार आपल्या नावात किंवा कायमच्या पत्त्यात बदल करील तेव्हा त्या फेरबदलाची खबर पेढीचा कोणताही भागीदार किंवा अभिकर्ता निबंधकाला पाठवू शकेल व कलम ६१ मध्ये उपबंधित केलेल्या रीतीने तो त्याबाबत कार्यवाही करील.

**पेढीमधील बदलांचे आणि तिच्या विसर्जनाचे वृत्त नमूद करणे.**

**६३.** (१) जेव्हा नोंदलेल्या पेढीच्या घटनेत बदल घडून येईल तेव्हा, कोणत्याही प्रवेशी, चालू किंवा निर्गामी भागीदार, आणि जेव्हा नोंदलेली पेढी विसर्जित होईल तेव्हा विसर्जनाच्या निकटपूर्वी जी भागीदार होती अशी व्यक्ती किंवा अशा कोणत्याही भागीदाराचा अभिकर्ता किंवा यासंबंधात विशेषत्वे प्राधिकृत केलेली व्यक्ती असा बदल किंवा विसर्जन झाल्याबाबतची तारीख विनिर्दिष्ट करून निबंधकास नोटीस देईल आणि पेढी-नोंदणीवहीतील त्या पेढीविषयक नोंदीत निबंधक त्या नोटिशीची नोंद करील आणि कलम ५९ खाली दप्तरदाखल केलेल्या पेढीविषयक निवेदनासोबत ती दप्तरदाखल करील.

**अज्ञान व्यक्तीच्या निष्क्रमणाचे वृत्त नमूद करणे.**

(२) पेढीमधील भागीदारीतील लाभार्थ ज्याला समावेशित करण्यात आलेले आहे अशा अज्ञान व्यक्तीला सज्ञानता प्राप्त होऊन तिने भागीदार होण्याचे किंवा न होण्याचे ठरवले, आणि पेढी त्यावेळी नोंदलेली पेढी असेल तर, ती व्यक्ती किंवा यासंबंधात विशेषत्वे प्राधिकृत केलेला तिचा अभिकर्ता, ती भागीदारी झालेली आहे किंवा झालेली नाही अशी निबंधकाला नोटीस देऊ शकेल, आणि निबंधक पोटकलम (१) मध्ये उपबंधित केलेल्या रीतीने त्या नोटिशीबाबत कार्यवाही करील.

**चुकांची दुरुस्ती.**

**६४.** (१) पेढी-नोंदणीवहीमधील कोणत्याही पेढीसंबंधीची नोंद या प्रकरणाखाली दप्तरदाखल करण्यात आलेल्या त्या पेढीसंबंधीच्या दस्तऐवजांनुरूप करण्यासाठी निबंधकाला कोणतीही चूक दुरुस्त करण्याची शक्ती सर्वकाळ राहील.

(२) या प्रकरणाखाली दप्तरदाखल करण्यात आलेला कोणताही पेढीविषयक दस्तऐवज ज्यांनी स्वाक्षरित केलेला असेल अशा सर्व पक्षांनी केलेल्या अर्जावरून अशा दस्तऐवजामधील किंवा पेढी-नोंदणीवहीमध्ये केलेल्या त्याच्या नोंदीमधील किंवा टिप्पणीमधील कोणतीही चूक निबंधकाला दुरुस्त करता येईल.

---

१. "क्राऊन किंवा भारत सरकार अथवा स्थानिक सरकार" या मजकुराचे विधि अनुकूलन आदेश, १९३७, विधि अनुकूलन आदेश, १९४८ आणि विधि अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे वरीलप्रमाणे अनुकूलन करण्यात आले.

२. "गव्हर्नर जनरल इन कौन्सिल" या मजकुराऐवजी हा मजकूर विधि अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे दाखल करण्यात आला.

३. उपरोक्त आदेशाद्वारे "भारत सरकारच्या सचिवांपैकी एखाद्या सचिवाच्या सहीच्या" हा मजकूर वगळण्यात आला.

४. उपरोक्त आदेशाद्वारे "त्याची" याऐवजी हा शब्द घालण्यात आला.

**न्यायालयाच्या आदेशाने नोंदणी वहीचे विशोधन.** ६५. नोंदलेल्या पेढीसंबंधीच्या कोणत्याही, बाबीवर निर्णय देणारे न्यायालय पेढी नोंदणी वहीतील अशा पेढीसंबंधीच्या नोंदीमध्ये आपल्या निर्णयाचे परिणामी असेल असे कोणतेही विशोधन निबंधकाने करावे असा निदेश देऊ शकेल, आणि निबंधक तद्नुसार त्या नोंदीत विशोधन करील.

**नोंदणीवही व दप्तरदाखल दस्तऐवज यांचे निरीक्षण.** ६६. (१) विहित करण्यात येईल अशी फी भरल्यानंतर कोणत्याही व्यक्तीला पेढी-नोंदणीवही निरीक्षणार्थ खुली राहील.

(२) या प्रकरणाखाली दप्तरदाखल केलेली सर्व निवेदने, नोटिसा आणि खबरी, विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने व अशा फीचा भरणा झाल्यावर, निरीक्षणार्थ खुल्या राहतील.

**नकला देणे.** ६७. निबंधक कोणत्याही व्यक्तीस अर्जावरून व विहित करण्यांत येईल अशा फीचा भरणा झाल्यावर पेढी-नोंदणीवहीतील कोणत्याही नोंदीची किंवा तिच्या कोणत्याही भागाची स्वदस्तुरानिशी प्रमाणित केलेली नक्कल पुरवील.

**पुराव्याचे नियम.** ६८. (१) पेढी-नोंदणीवहीमध्ये नमूद किंवा टिप्पण केलेले कोणतेही निवेदन, खबर किंवा नोटीस, ज्या व्यक्तीने किंवा जिच्यावतीने असे निवेदन, खबर किंवा नोटीस स्वाक्षरित केली होती अशा कोणत्याही व्यक्तीविरुद्ध त्यात निवेदिलेल्या कोणत्याही तथ्याचा निर्णायक पुरावा होईल.

(२) पेढी-नोंदणीवहीतील पेढीविषयक नोंदीची प्रमाणित नक्कल अशा पेढीची नोंदणी झाल्याच्या तथ्याच्या आणि तीमध्ये नमूद किंवा टिप्पण केलेल्या कोणत्याही निवेदनातील, खबरीतील किंवा नोटिशीतील मजकुराच्या शाबितीसाठी दाखल करता येईल.

**नोंदणी न केल्याचा परिणाम.** ६९. (१) पेढी नोंदलेली आहे आणि पेढीतील भागीदार म्हणून दावा लावणारी कोणतीही व्यक्ती पेढी-नोंदणीवहीत पेढीमधील भागीदार म्हणून दाखवलेली आहे किंवा होती असे नसेल तर, दावा लावणाऱ्या व्यक्तीला किंवा तिच्यावतीने पेढीविरुद्ध अथवा पेढीमध्ये जी भागीदार आहे किंवा होती असे अभिकथन करण्यात आले आहे अशा कोणत्याही व्यक्तीविरुद्ध संविदेतून उद्भवणारा किंवा या अधिनियमाने प्रदान केलेला अधिकार बजावण्याकरिता कोणत्याही न्यायालयात कोणताही दावा मांडता येणार नाही.

(२) पेढी नोंदलेली आहे आणि दावा लावणाऱ्या व्यक्ती पेढी-नोंदणीवहीत पेढीमधील भागीदार म्हणून दाखवलेल्या आहेत किंवा होत्या असे नसेल तर, पेढीला किंवा तिच्या वतीने कोणत्याही त्रयस्थ पक्षाविरूद्ध संविदेतून उद्भवणारा अधिकार बजावण्याकरिता कोणत्याही न्यायालयात कोणताही दावा मांडता येणार नाही.

(३) पोटकलमे (१) व (२) यांचे उपबंध, संविदेतून उद्भवणारा अधिकार बजावण्यासाठी केलेल्या वजावटीच्या हक्क मागणीला किंवा अन्य कार्यवाहीलाही लागू होतील, परंतु—

(क) पेढीच्या विसर्जनासाठी किंवा विसर्जित पेढीच्या हिशेबांसाठी दावा लावण्याच्या कोणत्याही अधिकाराच्या अथवा विसर्जित पेढीची संपत्ती प्राप्त करून घेण्याच्या कोणत्याही अधिकाराच्या किंवा शक्तीच्या बजावणीवर, अथवा

(ख) 'इलाखा-शहरे दिवाळखोरी अधिनियम, १९०९' (१९०९ चा ३) किंवा 'प्रांतीय दिवाळखोरी अधिनियम, १९२०' (१९२० चा ५) या खाली पदस्थ अभिहस्तांकिती, प्रापक किंवा न्यायालय यांना दिवाळखोर भागीदाराची संपत्ती प्राप्त करून घेण्याची जी शक्ती आहे तीवर परिणाम करणार नाहीत.

(४) (क) [1][ज्यांच्यावर या अधिनियमाचा विस्तार आहे अशा क्षेत्रामध्ये] ज्यांची धंद्याची कोणतीही जागा नसेल किंवा [2][उक्त क्षेत्रामधील] ज्यांच्या धंद्याच्या जागा [3][कलम ५६] खालील अधिसूचनेमुळे हे प्रकरण ज्यांना लागू होत नाही अशा क्षेत्रांत स्थित असतील त्या पेढ्यांना किंवा पेढ्यामधील भागीदारांना, किंवा

(ख) इलाखा शहरांमध्ये जो 'इलाखा लघुवाद न्यायालये अधिनियम, १८८२,' (१८८२ चा १५)-कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रकाराचा नसेल किंवा इलाखा-शहरांबाहेर जो 'प्रांतीय लघुवाद न्यायालये आधिनियम, १८८७' (१८८७ चा ९) च्या दुसऱ्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या प्रकारचा नसेल अशा, शंभर रुपयांहून अधिक मूल्य नसलेल्या कोणत्याही दाव्यास किंवा वजावटीच्या हक्कमागणीला, अथवा अशा कोणत्याही दाव्याला किंवा हक्कमागणीचा अनुषंगिक असलेल्या किंवा त्यातून उद्भवणाऱ्या कोणत्याही अंमलबजावणीच्या कार्यवाहीस किंवा अन्य कार्यवाहीस,

—हे कलम लागू होणार नाही.

---

१. १९५१ चा अधिनियम ३, कलम ३ व अनुसूचीद्वारे "भाग क राज्ये व भाग ग राज्ये यामध्ये" या ऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२. वरील अधिनियमाच्या कलम ३ व अनुसूचीद्वारे "अशा राज्यांमध्ये" या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

३. १९३४ चा अधिनियम २४, कलम २ व अनुसूचीद्वारे "कलम ५५" या ऐवजी दाखल केला.

**७०.** जो तपशील खोटा असल्याचे स्वतःला ज्ञात आहे किंवा जो खरा आहे असे स्वतः समजत नाही असा कोणताही तपशील अंतर्भूत असलेले अथवा जे तपशील अपूर्ण असल्याचे स्वतःला ज्ञात आहे किंवा ते पूर्ण आहेत असे स्वतः समजत नाही ते अंतर्भूत असलेले या प्रकरणाखालील कोणतेही निवेदन, विशोधक निवेदन, नोटीस किंवा खबर जी व्यक्ती स्वाक्षरित करील अशी कोणतीही व्यक्ती तीन महिन्यापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल. **खोटा तपशील पुरवल्याबद्दल दंड.**

**७१.** (१) [१][राज्य शासनाला] पेढी-निबंधकाकडे पाठवावयाच्या दस्तऐवजांसोबत किती फी द्यावी लागेल अथवा पेढी-निबंधकाच्या अभिरक्षेतील दस्तऐवजांच्या निरीक्षणासाठी किंवा नोंदणीवहीमधून नकला घेण्यासाठी किती फी द्यावी लागेल ते विहित करणारे नियम करता येतील : **नियम करण्याची शक्ती.**

परंतु, अशा फी अनुसूची एक मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कमाल फीहून अधिक असणार नाहीत.

(२) राज्य शासनाला पुढील प्रकारचे [२][सुद्धा] नियम करता येतील :—

(क्) कलम ५८ खाली सादर केल्या जाणाऱ्या निवेदनाचे आणि त्याच्या सत्यापनाचा नमुना विहित करणारे ;

(ख्) कलमे ६०, ६१, ६२ व ६३ याखालील निवेदने, खबरी व नोटिसा विहित स्वरूपात असणे आवश्यक करणारे आणि त्याचा नमुना विहित करणारे ;

(ग्) पेढी-नोंदणीवहीचा नमुना आणि तीत पेढीसंबंधी नोंदी करावयाची पद्धत आणि अशा नोंदी विशोधित करावयाची किंवा तीन टिप्पण्या करावयाची पद्धत विहित करणारे ;

(घ्) तंटे निर्माण होतील तेव्हा निबंधकाने अनुसरावयाच्या कार्यपद्धतीचे नियमन करणारे ;

(ङ्) निबंधकाकडे आलेले दस्तऐवज दप्तरदाखल करण्याबाबत नियमन करणारे ;

(च्) मूळ दस्तऐवजांच्या निरीक्षणाबाबतच्या शर्ती विहित करणारे ;

(छ्) नकला देण्याबाबत नियमन करणारे ;

(ज्) नोंदणी वह्या व दस्तऐवज काढून टाकण्याबाबत नियमन करणारे ;

(झ्) पेढी नोंदणीवहीचा निर्देशिका ठेवण्यासाठी व तिच्या नमुन्यासाठी उपबंध करणारे ; आणि

(ञ्) सर्वसाधारणपणे, या प्रकरणाची प्रयोजने पार पाडण्यासाठी.

(३) या कलमाखाली करण्यात आलेले सर्व नियम पूर्वप्रकाशनाच्या शर्तीस अधीन असतील.

[३][(४) राज्य शासनाने ह्या कलमाअन्वये केलेला प्रत्येक नियम तो केल्यानंतर ताबडतोब राज्य विधानमंडळासमोर ठेवण्यात येईल.]

## प्रकरण आठवे

## पूरक

**७२.** या अधिनियमाखालील जाहीर नोटीस— **जाहीर नोटीस देण्याची पद्धत.**

(क्) जर ती भागीदाराची नोंदलेल्या पेढीमधून निवृत्ती किंवा त्याला काढून टाकणे यांच्याशी अथवा नोंदलेल्या पेढीच्या विसर्जनाशी अथवा जी व्यक्ती अज्ञान म्हणून भागीदारीतील लाभार्थ समावेशित झाली होती तिने सज्ञानता प्राप्त झाल्यावर नोंदलेल्या पेढीचा भागीदार होण्याबाबत किंवा न होण्याबाबत करावयाच्या निवडीशी संबंधित असेल तर, कलम ६३ खाली पेढी-निबंधकाला नोटीस देऊन आणि **शासकीय राजपत्रातील** व ज्या पेढीशी ती संबंधित असेल तिच्या धंद्याची जागा किंवा मुख्य जागा जेथे असेल त्या जिल्ह्यात खप असलेल्या निदान एका तरी देशी भाषेतील वृत्तपत्रात प्रकाशित करून ; आणि

---

१. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांतिक सरकार" या ऐवजी घालण्यात आले.

२. विधि अनुकूलन आदेश, १९३७ द्वारे दाखल करण्यात आले.

३. १९८३ चा अधिनियम २०, कलम ७१ द्वारे समाविष्ट करण्यात आले (१५ मार्च, १९८४ रोजी व तेव्हापासून).

(ख) अन्य कोणत्याही बाबतीत, **शासकीय राजपत्रातील** आणि ज्या पेढीशी ती संबंधित असेल तिच्या धंद्याची जागा किंवा मुख्य जागा जेथे असेल त्या जिल्ह्यात खप असलेल्या निदान एका तरी देशी भाषेतील वृत्तपत्रात प्रकाशित करून द्यावी लागते.

**७३.** निरसन अधिनियम, १९३८ (१९३८ चा १) कलम २ व अनुसूची याद्वारे निरसित.

**व्यावृत्ती.** **७४.** (क) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वीच संपादित किंवा उपार्जित झालेले कोणतेही काम हक्क, हितसंबंध, ओढवलेले आबंधन किंवा दायित्व, अथवा

(ख) असा कोणताही अधिकार, हक्क, हितसंबंध, आबंधन किंवा दायित्व अथवा या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी केलेली किंवा न केलेली कोणतीही गोष्ट यांच्या संबंधातील कोणतीही वैध कार्यवाही किंवा उपाय, अथवा

(ग) या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी केलेली किंवा न केलेली कोणतीही गोष्ट, अथवा

(घ) या अधिनियमाने व्यक्तपणे निरसित न केलेली भागीदारीसंबंधीची कोणतीही अधिनियमिती, अथवा

(ङ) भागीदारीसंबंधीचा कोणताही दिवाळखोरीचा नियम, अथवा

(च) या अधिनियमाशी विसंगत नसलेला कोणताही विधिनियम,

यांवर या अधिनियमातील कोणतीही गोष्ट परिणाम करणार नाही किंवा परिणाम करते असे मानले जाणार नाही.

## अनुसूची पहिली

### कमाल फी

[ कलम ७१ चे पोटकलम (१) पहा ]

| ज्याच्यासंबंधी फी प्रदेय असेल असा दस्तऐवज किंवा कृती | कमाल फी |
|---|---|
| कलम ५८ खालील निवेदन . . | तीन रुपये |
| कलम ६० खालील निवेदन . . | एक रुपया |
| कलम ६१ खालील खबर . . | एक रुपया |
| कलम ६२ खालील खबर . . | एक रुपया |
| कलम ६३ खालील नोटीस . . | एक रुपया |
| कलम ६४ खालील अर्ज . . | एक रुपया |
| कलम ६६-पोटकलम (१) खाली पेढी नोंदणीवहीचे निरीक्षण. | नोंदणीवहीच्या एका ग्रंथाच्या निरीक्षणासाठी आठ आणे. |
| कलम ६६-पोटकलम (२) खाली पेढीशी संबंधित असलेल्या दस्तऐवजांचे निरीक्षण. | एका पेढीशी संबंधित असलेल्या सर्व दस्तऐवजांच्या निरीक्षणासाठी आठ आणे. |
| पेढी-नोंदणीवहीतून घ्यावयाच्या नकला . . | दर शंभर शब्द किंवा त्यांचा भाग यासाठी चार आणे. |

अनुसूची २ री [ अधिनियमिती निरसित ] निरसन अधिनियम, १९३८ (१९३८ चा १) कलम २ व अनुसूचीद्वारे निरसित.

# परिशिष्ट – महाराष्ट्र विशोधन अधिनियम

## भारतीय भागीदारी (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९७३

## (१९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५)

**' भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२ ' हा महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्यात सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी ' भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२ ' हा महाराष्ट्र राज्यात लागू करताना त्यात सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चोविसाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

**संक्षिप्त नाव व प्रारंभ.**

१. (१) या अधिनियमास ' भारतीय भागीदारी (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९७३ ' असे म्हणता येईल.

(२) तो, राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियुक्त करील अशा दिनांकास अंमलात येईल.

**१९३२ चा अधिनियम ९ याच्या पहिल्या अनुसूचीची सुधारणा.**

२. भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२ हा महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्याच्या पहिल्या अनुसूचीमध्ये " कमाल फी " या शीर्षकाखालील —

(१) " तीन रुपये " या शब्दाऐवजी " पंधरा रुपये " हे शब्द घालण्यात येतील.

(२) " एक रुपया " हे शब्द जेथे जेथे येतील तेथे तेथे त्याऐवजी " पाच रुपये " हे शब्द दाखल करण्यात येतील ;

(३) " आठ आणे " हे शब्द ज्या दोन ठिकाणी आले आहेत त्या दोन ठिकाणी त्याऐवजी " दोन रुपये पन्नास पैसे " हे शब्द घालण्यात येतील ;

(४) " चार आणे " या शब्दांऐवजी " पन्नास पैसे " हे शब्द घालण्यात येतील.

# भारतीय भागीदारी (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९८४

## (१९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९)

**भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२ हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.**

१९३२ चा. ९. **ज्याअर्थी,** भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२ हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी त्यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पस्तिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**संक्षिप्त नाव व प्रारंभ.**

१. (१) या अधिनियमास, भारतीय भागीदारी (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९८४ असे म्हणता येईल.

(२) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल त्या तारखेस अंमलात येईल.

**सन १९३२ चा अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम २ ची सुधारणा.**

२. भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२ (यात यापुढे ज्याचा " मुख्य अधिनियम " असा निर्देश करण्यात आला आहे), हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम २ मध्ये, खंड (ग्) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (ग्-१) ' निबंधक ' म्हणजे कलम ५७, पोटकलम (१) अन्वये नियुक्त केलेला पेढीनिबंधक आणि त्यात त्या कलमाच्या पोटकलम (२) अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या पेढी उप निबंधकाचा आणि पेढी सहायक निबंधकाचा समावेश होतो ;".

**सन १९३२ चा अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ९ ची सुधारणा.**

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ९ मध्ये " त्याच्या वैध प्रतिनिधीला " या मजकुराऐवजी " त्याचा वारसाला किंवा वैध प्रतिनिधीला " हा मजकुर दाखल करण्यात येईल.

**सन १९३२ चा अधिनियम क्रमांक ९ च्या कलम १२ ची सुधारणा.**

४. मुख्य अधिनियमाच्या कलम १२ मध्ये,—

(अ) खंड (ग्) मधील शेवटी येणारा " आणि " हा शब्द वगळण्यात येईल ;

(ब) खंड (घ्) मध्ये, " अधिकार आहे ", या मजकुराऐवजी " अधिकार आहे ; आणि " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(क) खंड (घ्) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (ङ्) भागीदार मरण पावल्यास, त्याच्या वारसांना किंवा वैध प्रतिनिधींना किंवा त्यांनी यथोचितरीत्या प्राधिकृत केलेल्या अभिकर्त्यास (एजंटास) पेढीच्या पुस्तकांपैकी कोणतेही पुस्तक उपलब्ध होण्याचा, त्याचे निरीक्षण करण्याचा आणि ते नक्कलण्याचा अधिकार असेल.".

**सन १९३२ चा अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ५७ ऐवजी नवीन कलम दाखल करणे.**

५. मुख्य अधिनियमाच्या कलम ५७ ऐवजी पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

**पेढी निबंधक, पेढी उप निबंधक आणि पेढी सहायक निबंधक यांची नियुक्ती.**

" **५७.** (१) राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, पेढी निबंधकाची नियुक्ती करता येईल आणि उक्त निबंधक, या अधिनियमाखालील निबंधकाच्या अधिकारांचा संपूर्ण महाराष्ट्र राज्यात वापर करील आणि त्याची कामे व कर्तव्ये पार पाडील.

(२) त्याचप्रमाणे राज्य शासनास एका किंवा त्यापेक्षा अधिक पेढी उप निबंधकांची आणि पेढी सहायक निबंधकांची नियुक्ती करता येईल आणि ते राज्य शासनाकडून **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट करता येईल अशा क्षेत्रांमध्ये, निबंधकांच्या, विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करतील आणि त्याची कामे व कर्तव्ये पार पाडतील.

(३) पोटकलम (१) आणि पोटकलम (२) अन्वये नियुक्त करण्यात आलेले अधिकारी हे, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.".

**सन १९३२ चा अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ५८ ची सुधारणा.**

६. मुख्य अधिनियमाच्या कलम ५८ मध्ये,—

(अ) पोटकलम (१) मध्ये,—

(एक) " किंवा त्याच्याकडे सुपूर्द करून " या मजकुरानंतर " पोटकलम (१-क) च्या उपबंधास अधीन राहून," हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(दोन) " कोणत्याही वेळी " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(तीन) " विहित फीसह " या मजकुराऐवजी " विहित फी आणि भागीदारी विलेखाची एक सत्यप्रत यासह " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(चार) खंड (क्) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (क्क्) पेढीच्या धंद्याचे स्वरूप ;";

(ब) पोटकलम (१) नंतर पुढील पोटकलम समाविष्ट करण्यात येईल :—

" (१-क्) पोटकलम (१) खालील निवेदन हे, पेढीची रचना झाल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत निबंधकाकडे पाठविण्यात किंवा त्याच्या सुपूर्द करण्यात येईल :

परंतु, भारतीय भागीदारी (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९८४ याच्या प्रारंभाच्या तारखेस किंवा तत्पूर्वी धंदा करणाऱ्या कोणत्याही पेढीच्या बाबतीत, असे निवेदन हे, अशा तारखेपासून एक वर्षाच्या आत, निबंधकाकडे पाठविण्यात किंवा त्याच्या स्वाधीन करण्यात येईल." १९८४ चा महाराष्ट्र २९.

(क) पोटकलम (३) ऐवजी पुढील पोटकलमे दाखल करण्यात येतील :—

" (३) चिन्हे व नावे (यांचा दुरुपयोग करण्यास प्रतिबंध करण्याबाबत) अधिनियम, १९५० याच्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली नावे किंवा चिन्हे यांपैकी कोणतेही नाव किंवा चिन्ह, किंवा त्या अधिनियमान्वये तसे करण्यास परवानगी दिलेली असल्याखेरीज, त्याची सत्याभासी प्रतिकृती, किंवा साम्यामुळे लोक ज्या नावाचा कोणत्याही अन्य पेढीच्या नावाशी संबंध जोडण्याचा संभव असेल असे कोणतेही नाव, किंवा लेखी नमूद करावयाच्या कारणावरून, निबंधकाच्या मते जे अनिष्ट आहे असे कोणतेही नाव, पेढी धारण करणार नाही :

परंतु, या पोटकलमातील कोणतीही गोष्ट, भारतीय भागीदारी (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९८४ याच्या प्रारंभाच्या तारखेपूर्वी, अशा कोणत्याही नावाने नोंदणी केलेल्या कोणत्याही पेढीला लागू होणार नाही. १९८४ चा महाराष्ट्र २९.

(४) निबंधकाच्या, पोट-कलम (३) खालील एखाद्या आदेशाने व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला, असा आदेश कळविण्यात आल्याच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत, राज्य शासनाने या संदर्भात प्राधिकृत केला असेल अशा शासनाच्या उप सचिवापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याकडे, विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशी फी भरून अपील करता येईल असे कोणतेही अपील मिळाल्यावर, प्राधिकृत अधिकारी अपीलकर्त्याला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, अपिलावर निर्णय देईल आणि त्याचा निर्णय अंतिम असेल."

**सन १९३२ चा अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ५९ ची सुधारणा.**

७. मुख्य अधिनियमाच्या कलम ५९ ला त्या कलमाचे पोटकलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात येईल, आणि,—

" (अ) अशा प्रकारे नव्याने क्रमांक देण्यात आलेल्या पोटकलम (१) मध्ये, " दप्तरदाखल करील." या मजकुरानंतर " अशी नोंद नमूद करण्यात येईल आणि असे निवेदन दप्तरदाखल करण्यात येईल त्या तारखेस, पेढी नोंदणीकृत असल्याचे मानण्यात येईल." हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल.

(ब) अशा प्रकारे नवीन क्रमांक दिलेल्या पोटकलम (१) नंतर पुढील पोटकलम जादा दाखल करण्यात येईल :—

" (२) नोंदणी झालेली असेल अशी पेढी '(नोंदणीकृत)' या मजकुराचा कंसासह तिच्या नावासमोर वापर करील.".

**सन १९३२ चा अधिनियम क्रमांक ९ यात कलम ५९ क-१ समाविष्ट करणे.**

८. मुख्य अधिनियमाच्या कलम ५९ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

**शास्तीची रक्कम देऊन उशिरा नोंदणी करणे.**

**"५९-क.** १. जर कलम ५८, पोटकलम (१-क्) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत कोणत्याही पेढीसंबंधातील निवेदन निबंधकाकडे पाठविण्यात किंवा त्याच्या स्वाधीन करण्यात आलेले नसेल तर विलंबाच्या प्रत्येक वर्षाकरिता किंवा त्याच्या भागाकरिता शंभर रुपये इतकी शास्तीची रक्कम निबंधकाकडे भरून पेढीची नोंदणी करता येईल.".

९. मुख्य अधिनियमाच्या कलम ६० मध्ये,—

**सन १९३२ चा अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ६० ची सुधारणा.**

(अ) पोटकलम (१) ऐवजी पोटकलम दाखल करण्यात येईल :—

" (१) पेढीच्या नावात किंवा पेढीच्या धंद्याच्या स्वरूपात किंवा नोंदणीकृत पेढीच्या धंद्याच्या मुख्य जागेच्या ठिकाणामध्ये एखादा फेरबदल करण्यात येईल तेव्हा फेरबदल विनिर्दिष्ट करणारे आणि कलम ५८ अन्वये आवश्यक असलेल्या रीतीने स्वाक्षरित व सत्यापित केलेले एक निवेदन, विहित फीसह, असा फेरबदल करण्यापासून ९० दिवसांच्या आत, निबंधकाकडे पाठविण्यात येईल.".

(ब) समास टीपेतील " पेढीच्या नावातील " या मजकुरानंतर, " धंद्याच्या स्वरूपातील " हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल :—

१०. मुख्य अधिनियमाच्या कलम ६१ मध्ये, " निबंधकास त्याची खबर देऊ शकेल आणि " या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

**सन १९३२ चा अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ६१ ची सुधारणा.**

" अशा प्रकारे धंदा बंद करण्यात आल्याच्या तारखेपासून किंवा, यथास्थिति, अशा जागेत त्या पेढीने धंदा चालवण्यास सुरुवात केल्याच्या तारखेपासून ९० दिवसांच्या आत, निबंधकास त्याची खबर देईल, नंतर."

११. मुख्य अधिनियमाच्या कलम ६२ मध्ये, " पाठवू शकेल " या मजकुरा ऐवजी " असा फेरबदल केल्याच्या तारखेपासून ९० दिवसांच्या आत पाठवील " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**सन १९३२ चा अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ६२ ची सुधारणा.**

१२. मुख्य अधिनियमाच्या कलम ६३ मध्ये,—

**सन १९३२ चा अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ६३ ची सुधारणा.**

(अ) पोटकलम (१) मध्ये,—

(एक) पहिल्या ओळीतील " कोणताही " तिसऱ्या ओळीतील " कोणतीही " व " कोणत्याही " या शब्दांऐवजी त्या त्या ठिकाणी " प्रत्येक " हा शब्द दाखल करण्यात येईल ;

(दोन) " अशा बदलाची किंवा विसर्जनाची नोटीस, त्याचा दिनांक विनिर्दिष्ट करून निबंधकाला देऊ शकेल, " या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" असा बदल किंवा असे विसर्जन झाल्याच्या तारखेपासून ९० दिवसांच्या आत, अशा बदलांची किंवा विसर्जनाची नोटीस, त्याचा दिनांक विनिर्दिष्ट करून निबंधकाला देईल ;";

(ब) पोटकलम (१) नंतर, पुढील पोटकलम जादा दाखल करण्यात येईल :—

" (१-क) नोंदलेल्या पेढीच्या घटनेत बदल घडून येईल त्या बाबतीत, अशा बदलानंतर पेढीच्या भागीदार असतील अशा सर्व व्यक्ती, असा बदल घडून आल्याच्या तारखेपासून ९० दिवसांच्या आत, अशा बदलाची त्यांनी रीतसर स्वाक्षरित केलेली खबर, संयुक्तपणे, निबंधकाकडे पाठवतील आणि निबंधक, कलम ६१ द्वारे उपबंधित केलेल्या रीतीने त्याबाबत कार्यवाही करील ;";

(क) पोटकलम (२) मध्ये " अशा निबंधकाला नोटीस देऊ शकेल " या मजकुराऐवजी " अशा नोटीस त्याने त्या गोष्टीची निवड केल्याच्या तारखेपासून ९० दिवसांच्या आत, निबंधकाला देईल, " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

१३. मुख्य अधिनियमाच्या कलम ६९ मध्ये —

**सन १९३२ चा अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ६९ ची सुधारणा.**

(अ) पोटकलम (१) मध्ये पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु या पोटकलमान्वये पेढी नोंदलेली असणे आवश्यक असेल ही बाब पेढीच्या मरण पावलेल्या भागीदाराच्या वारसांनी किंवा वैध प्रतिनिधींनी पेढीच्या हिशेबासाठी किंवा पेढींची संपत्ती प्राप्त करून घेण्यासाठी लावलेल्या दाव्यांच्या किंवा कार्यवाहीच्या बाबतीत लागू असणार नाही. ";

(ब) पोटकलम (२) नंतर पुढील पोटकलम समाविष्ट करण्यात येईल :—

" (२-क) पेढी नोंदलेली नसेल आणि दावा लावणारी व्यक्ती पेढी नोंदणीवहीत पेढीतील भागीदार म्हणून दाखवलेली किंवा दाखवण्यात आलेली नसेल तर पेढीतील भागीदार म्हणून दावा लावणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला किंवा तिच्या वतीने पेढीविरुद्ध किंवा पेढीमध्ये जी भागीदार आहे किंवा होती असे अभिकथन करण्यात आले आहे अशा कोणत्याही व्यक्तीविरुद्ध पेढीच्या विसर्जनासंबंधीचा किंवा

विसर्जित पेढीच्या हिशेबासंबंधीचा, किंवा विसर्जित पेढीची संपत्ती प्राप्त करून घेण्यासंबंधीचा कोणताही हक्क अथवा अधिकार बजावण्यासाठी कोणत्याही न्यायालयात कोणताही दावा लावता येणार नाही :

परंतु, या पोटकलमान्वये पेढी नोंदलेली असणे आवश्यक असेल ही बाब पेढीच्या मरण पावलेल्या भागीदाराच्या वारसांनी किंवा वैध प्रतिनिधींनी विसर्जित पेढीच्या हिशेबासाठी किंवा विसर्जित पेढीची संपत्ती प्राप्त करून घेण्याकरिता सुरू केलेल्या दाव्यांच्या किंवा कार्यवाहीच्या बाबतीत लागू असणार नाही.";

(क) पोटकलम (३) मध्ये —

(एक) " पोटकलमे (१) व (२)" या मजकुराऐवजी " पोटकलमे (१), (२) व (२क)" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) खंड (क्) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

" (क्) सहा महिन्यापर्यंतच्या मुदतीसाठी किंवा [illegible] हजार रुपयांपर्यंतच्या भांडवलाने सुरू करण्यात आलेल्या पेढ्या यांना अथवा ".

**सन १९३२ चा अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ६९-अ समाविष्ट करणे.**

१४. मुख्य अधिनियमाच्या कलम ६९ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

**कलम ६०,६१,६२ किंवा ६३ चे उल्लघंन केल्याबद्दल शास्ती.**

" **६९-क.** कोणत्याही नोंदलेल्या पेढीच्या संबंधात कलम ६०, ६१, ६२ किंवा ६३ अन्वये कोणतेही निवेदन खबर किंवा नोटीस त्या कलमात विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत निबंधकाकडे पाठविण्यात किंवा त्याला ती देण्यात आलेली नसेल तर निबंधकास पेढीच्या भागीदारांना नोटीस दिल्यावर आणि त्यांना त्यांची बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, कलमे ६०, ६१, ६२ किंवा, यथास्थिति, ६३ यात विनिर्दिष्ट केलेली मुदत समाप्त होण्याच्या तारखेपासून पेढीच्या संबंधातील नोंदीमध्ये योग्य प्रकारें सुधारणा करण्याच्या तारखेपर्यंतच्या मुदतीच्या संबधात निबंधक ठरवून देईल अशी प्रत्येक दिवसास दहा रुपये यापेक्षा अधिक नसेल इतकी शास्तीची रक्कम पेढीच्या भागीदाराकडून दिली जाईपर्यंत पेढीशी संबंधित असलेल्या अभिलेखामध्ये योग्य त्या सुधारणा करण्यास नकार देता येईल."

**सन १९३२ चा अधिनियम क्रमांक ९ व याच्या कलम ७० ची सुधारणा.**

१५. मुख्य अधिनियमाच्या कलम ७० मध्ये " अशी कोणतीही व्यक्ती" या शब्दांनी सुरू होणाऱ्या दोन्ही " शिक्षांस पात्र होईल," या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" अशा कोणत्याही व्यक्तीला, अपराधसिद्धिनंतर एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कारावासाची किंवा द्रव्यदंडाची शिक्षा किंवा या दोन्हीं शिक्षा होतील :

परंतु, न्यालयाच्या न्यायनिर्णयात नमूद करणे आवश्यक आहे अशी विशेष आणि पुरेशी कारणे नसतील तर हा द्रव्यदंड एक हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही."

**सन १९३२ चा अधिनियम क्रमांक ९ यात कलम ७०-क समाविष्ट करणे.**

१६. मुख्य अधिनियमाच्या कलम ७० नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

**कमाल फी आणि अनुसूची एक सुधारण्याचा अधिकार.**

" **७०क.** (१) हा अधिनियम आणि त्याखाली तयार केलेले नियम याअन्वये द्यावयाची फी अनुसूची १ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कमाल फीपेक्षा अधिक असणार नाही.

(२) या कलमाच्या उपबंधास अधीन राहून, राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता केलेला किंवा करावयाचा खर्च लक्षात घेऊन, वेळोवेळी **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अनुसूची १ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कमाल फीच्या कोणत्याही रकमेत आणि अन्य तपशीलात बदल करता येईल आणि, त्यानंतर, उक्त अनुसूची ही त्यानुसार सुधारण्यात आल्याचे मानण्यात येईल.

(३) पोटकलम (२) खाली काढण्यात आलेली प्रत्येक अधिसूचना ही, तीमध्ये ह्या प्रयोजनाकरिता कोणतीही अन्य तारीख विनिर्दिष्ट करण्यात आलेली नसेल तर, **शासकीय राजपत्रात** ती प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून अंमलात येईल.

(४) राज्य शासनाने पोटकलम (२) अन्वये काढलेली प्रत्येक अधिसूचना, ती काढण्यात आल्यानंतर शक्य

तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनांत, एकूण तीस दिवसांची होईल तितक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात ती अशा रीतीने ठेवण्यात आली असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या अधिसूचनेत कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा अधिसूचना काढण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील व असा निर्णय **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करतील तर, असा निर्णय प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून यथास्थिति अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अधिसूचना अंमलात येईल किंवा येणार नाही. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या अधिसूचनेअन्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.''.

**सन १९३२ चा अधिनियम क्रमांक ९ व याच्या कलम ७१ ची सुधारणा.**

१७. मुख्य अधिनियमाच्या कलम ७१ मध्ये, —

(अ) पोटकलम (१) ऐवजी पुढील पोटकलम दाखल करण्यात येईल :—

'' (१) कलम ७०-क च्या उपबंधास अधीन राहून, राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, निबंधकाकडे पाठवल्या जाणाऱ्या दस्ताऐवजासोबत पाठवण्यात येईल अशी किंवा निबंधकाकडे देण्यात येणारी खबर, नोटीस किंवा अर्ज यासंबंधात देण्यात येईल अशी किंवा निबंधकाच्या अभिरक्षेतील दस्तऐवजांच्या निरीक्षणासाठी किंवा पेढीनोंदणी वहीतून नकला घेण्यासाठी द्यावी लागेल अशी किंवा कोणताही विहित नमुना पुरवण्यासाठी देण्यात येईल अशी फी विहित करणारे नियम करता येतील. ''.

(ब) पोटकलम (२) मध्ये —

(एक) खंड (क्) मध्ये '' कलम ५८ खाली '' या मजकुराऐवजी '' कलम ५८ च्या पोटकलम (१) खाली '' हा मजकूर दाखल करण्यात येईल.

(दोन) खंड (क) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

''(कूक्) कलम ५८ च्या पोटकलम (४) खाली अपील दाखल करावयाची पद्धती विहित करणारे ;'';

(क) पोटकलम (४) ऐवजी पुढील पोटकलम दाखल करण्यात येईल :—

''(४) ह्या कलमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकुण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील व असा निर्णय **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या तारखेपासून यथास्थिति अशा फेरबदल केलेल्या, स्वरूपातच नियम अंमलात येईल किंवा येणार नाही. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.''

**सन १९३२ चा अधिनियम क्रमांक ९ याच्या अनुसूची १ ऐवजी नवीन अनुसूची दाखल करणे.**

१८. मुख्य अधिनियमास जोडलेल्या अनुसूची १ ऐवजी पुढील अनुसूची दाखल करण्यात येईल :—

'' **अनुसूची १**

**कमाल फी**

(कलमे ७०-क व ७१ पहा)

| ज्याच्यासंबंधी फी प्रदेय असेल असा दस्ताऐवज किंवा कृती (१) | कमाल फी (२) |
|---|---|
| (१) कलम ५८ (१) खालील निवेदन .. .. | .. पन्नास रुपये. |
| (२) कलम ५८ (४) खालील अपिलाचे ज्ञापन .. | .. पंचवीस रुपये. |
| (३) कलम ६० (१) खालील निवेदन .. .. | .. पंधरा रुपये. |
| (४) कलम ६१ खालील खबर .. | .. पंधरा रुपये. |
| (५) कलम ६२ खालील खबर .. .. | .. पंधरा रुपये. |
| (६) कलम ६३ (१) खालील नोटीस .. .. | .. पंधरा रुपये. |
| (७) कलम ६३ (१अ) खालील खबर .. | .. पंधरा रुपये. |
| (८) कलम ६३ (२) खालील नोटीस .. .. | .. पंधरा रुपये. |

**अनुसूची**—चालू

| (१) | (२) | |
|---|---|---|
| (९) | कलम ६४ खालील अर्ज .. .. | .. पंधरा रुपये. |
| (१०) | कलम ६६, पोटकलम (१) खाली पेढी नोंदणीवहीचे निरीक्षण-- पेढी नोंदणीवहीच्या एका खंडाच्या निरीक्षणासाठी. | सात रुपये पन्नास पैसे. |
| (११) | कलम ६६, पोटकलम (२) खाली पेढीशी संबंधित असलेल्या दस्ताऐवजाचे निरीक्षण, एका पेढीशी संबंधित असलेल्या सर्व दस्तऐवजांच्या निरीक्षणासाठी. | सात रुपये पन्नास पैसे. |
| (१२) | कलम ६७ खाली पेढी-नोंदणीवहीतून घ्यावयाच्या नकला-दर शंभर शब्द किंवा त्याचा भाग यासाठी. | दोन रुपये. |
| (१३) | नियमांद्वारे विहित् केलेल्या नमुन्यांची किंमत .. .. | .. प्रत्येक नमुन्यास एक रुपया. ” |

# THE INDIAN PARTNERSHIP ACT, 1932

## भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२

इंग्रजी–मराठी अनुसूची

| | | |
|---|---|---|
| Adjudication | अभिनिर्णीती | [S.34(1)] |
| Admitted | समावेशित | [S.30] |
| Adventures | प्रोद्यम | [S.8] |
| Agent | अभिकर्ता | [S.2(a)] |
| Agreements of restraint of trade | व्यापार निरोधी करार | [S.54] |
| Amendment | विशोधन | [S.65] |
| Application | उपयोजन | [S.15] |
| Applied | उपयोजित | [S.15] |
| Assertion | प्रपादन | [S.30(6)] |
| Attributable | संबंधनीय | [S.30] |
| Business | धंदा | [S.2(b)] |
| Buyer | क्रेता | [S.55(2)] |
| Circumstances similar to— | —सदृश परिस्थिती | [S.13 (ii)] |
| Common | सामाईक | [S.6 e.g.(1)] |
| Conduct | चालन | [S.10] |
| Continuing guarantee | चालती हमी | [S.38] |
| Contract | संविदा | [S.5] |
| Copy, certifed under one's hand | स्वदस्तुरानिशी प्रमाणित केलेली नक्कल | [S.67] |
| Consideration | प्रतिफल | [S.6 e.g. 2(d)] |
| Custom | १. गिऱ्हाईकी | [S.55(2)(c)] |
| | २. रुढी | [S.19(2)] |
| Dealing | व्यवहारक्रम | [S.11] |
| Decided | निर्णीत | [S.12(c)] |
| Earned | अर्जित | [S.6 e.g.(2)] |
| Estate | संपदा | [S.34(2)] |
| Express | व्यक्त | [S.11] |
| Final Settlement | अंतिम निश्चिती | [S.37] |
| Firm | पेढी | [S.2(d)] |
| Fraud | कपट | [S.10] |
| Goodwill | ख्यातिस्व | [S.6 e.g. 2(d)] |
| Habitually | नित्यंश: | [S.24] |
| Holding out | अभिवेदन | [S.28] |
| Implied | उपलक्षित | [S.12] |
| Incidental | अनुषंगिक | [S.17(b)] |
| Incoming | प्रवेशी | [hap. V Title] |
| Indemnify | हानिरक्षण | [S.1] |
| Individually | प्रत्येकश: | [S.48(a)] |

| | | |
|---|---|---|
| Joint | संयुक्त | [S.6 e.g. 1] |
| Losses sustained by the firm | पेढीला पोचलेला तोटा | [S.13(b)] |
| Misapplication | दुरुपयोजन | [S.27 (a)] |
| Misrepresentation | अपवेदन | [S.52] |
| Mutual | अन्योन्य | [S.10] |
| Occupation | जीविका | [S.2 (b)] |
| Omission | अकृती | [S.26] |
| On account of capital | भांडवलकारणे | [S.48 (b) (iii)] |
| Option | विकल्प/विकल्पाधिकार | [S.37] |
| Ordinary course of business | धंद्याच्या सामान्य क्रमात | [S.23] |
| Ordinary prudence | सर्वसामान्य व्यवहारदृष्टी | [S.21] |
| Outgoing | निर्गामी | [chap. V Title] |
| Partner | भागीदार | [S.2 (a)] |
| Partnership at will | इच्छाधीन भागीदारी | [S.7] |
| Pay | भरणा | [S.16(a)] |
| Prescribed | विहित | [S.2(c)] |
| Profession | पेशा | [S.2(b)] |
| Rateably pay | हिस्सेरशीने भरणा | [S.48 (b)(ii)] |
| Register of firms | पेढी-नोंदणीवही | [S.66(1)] |
| Registrar of firms | पेढी निबंधक | [S.57(1)] |
| Remuneration | पारिश्रमिक | [S.13(a)] |
| Representation | अभिवेदन | [S.28] |
| Rescind | विखंडन | [S.52] |
| Residue | अवशिष्ट | [S.48(b)(iv)] |
| Revocation | प्रत्याहरण | [S.38] |
| Revoked | प्रत्याहृत | [S.38] |
| Rights of restrain | निरोधण्याचा अधिकार | [S.53] |
| Statement | निवेदन | [S.58(1)] |
| Subscription | अधिदान | [S.13(c)] |
| Surplus | वाढावा | [S.49] |
| Surviving | उत्तरजीवी | [S.37] |
| To assume | आव आणणे | [S.37] |
| To copy | नक्कलणे | [S.12(d)] |
| Trade | उदीम | [S.2(b)] |
| Transaction | संव्यवहार | [S.16(a)] |
| Transferee | हस्तांतरिती | [S.29] |
| Undertaking | उपक्रम | [S.8] |
| Undivided | अविभक्त | [S.5] |
| Unrepealed | अनिरसित | [S.3] |
| Usage | परिपाठ | [S.19(2)] |
| Verify | सत्यापन | [S.58(2)] |
| Wilful neglect | बुद्धिपुरस्सर हलगर्जीपणा | [S.13(f)] |
| Wound up | परिसमापित | [S.46] |
| Wrongful act | गैरकृती | [S.26] |

# भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२
# THE INDIAN PARTNERSHIP ACT, 1932
## मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अकृती | Omission | [क.२६] |
| अर्जित | Earned | [क.६ उदा. २] |
| अधिदान | Subscription | [क.१३(ग)] |
| आनुषंगिक | Incidental | [क.१७(ख)] |
| अन्योन्य | Mutual | [क.१०] |
| अनिरसित | Unrepealed | [क.३] |
| अपवेदन | Misrepresentation | [क.५२] |
| अभिकर्ता | Agent | [क.२(क)] |
| अभिनिर्णीत | 1. Adjudicated | [क.३४(१)] |
| | 2. Adjudication | [क.३४(१)] |
| अभिवेदन | Holding out, Represented | [क.२८] |
| अवशिष्ट | Residue | [क.४८(ख)(चार)] |
| अविभक्त | Undivided | [क.५] |
| आव आणणे | To assume | [क.३७] |
| अंतिम निश्चिती | Final settlement | [क.३७] |
| इच्छाधीन भागीदारी | Partnership at will | [क. ७] |
| उत्तरजीवी | Surviving | [क.३७] |
| उदीम | Trade | [क.२ (ख)] |
| उपक्रम | Undertaking | [क.८] |
| उपयोजन | Application | [क.१५] |
| उपयोजित | Applied | [क.१५] |
| उपलक्षित | Implied | [क.१२] |
| कपट | Fraud | [क.१०] |
| क्रेता | Buyer | [क.५५ (२)] |
| ख्यातिस्व | Goodwill | [क.६ उदा. २(घ)] |
| गिऱ्हाईकी | Custom | [क.५५(५) (ग)] |
| गैरकृती | Wrongful act | [क.२६] |
| चालती हमी | Continuing guarantee | [क.३८] |
| चालन | Conduct | [क.१०] |
| जीविका | Occupation | [क.२(ख)] |
| दुरुपयोजन | Misapplication | [क.२७ (क)] |
| धंदा | Business | [क.२ (ख)] |

| | | |
|---|---|---|
| धंद्याच्या सामान्य क्रमात | Ordinary Course of Business | [क.२३] |
| नक्कलणे | To copy | [क.१२(घ)] |
| निर्गामी | Outgoing | [प्रकरण पाचवे-शीर्षक] |
| निर्णीत | Decided | [क.१२(ग)] |
| नित्यंश : | Habitually | [क.२४] |
| निरोधण्याचा अधिकारी | Rights to restrain | [क.५३] |
| निवेदन | Statement | [क.५८(१)] |
| परिपाठ | Usage | [क.१९(२)] |
| परिमापित | Wound up | [क.४६] |
| पारिश्रमिक | Remuneration | [क.१३(क)] |
| पेढी | Firm | [क.२(घ)] |
| पेढी-नोंदणीवही | Register of Firms | [क.६६(१)] |
| पेढी निबंधक | Registrar of Firms | [क.५७(१)] |
| पेढीला पोचलेला तोटा | Losses sustained by the firm | [क.१३(ख)] |
| पेशा | Profession | [क.२८(ख)] |
| प्रतिफल | Cousideration | [क.६उदा. २(घ)] |
| प्रत्याहरण | Revocation | [क.३८] |
| प्रत्याहृत | Revoked | [क.३८] |
| प्रत्येकशः | Individually | [क.४८(क)] |
| प्रपादन | Assertion | [क.३०(६)] |
| प्रवेशी | Incoming | [प्रकरण पाचवे-शीर्षक] |
| प्रोद्यम | Adventures | [क.८] |
| बुद्धिपुरस्सर हलगर्जीपणा | Wilful neglect | [क.१३(च)] |
| भरणा | Pay | [क.१६(क)] |
| भागीदार | Partner | [क.२(क)] |
| भांडवलाकारणे | On Account of Capital | [क.४८(ख) (तीन)] |
| रुढी | Custom | [क.१९ (२)] |
| वाढावा | Surplus | [क.४९] |
| विकल्प | Option | [क.३७] |
| विकल्पाधिकार | Option | [क.३७] |
| विखंडन | Rescind | [क.५२] |
| विशोधन | Amendment | [क.६५] |
| विहित | Prescribed | [क.२(ग)] |
| व्यक्त | Express | [क.११] |

| | | |
|---|---|---|
| व्यवहारक्रम | Dealing | [क.११] |
| व्यापारनिरोधी करार | Agreements of restraint of trade | [क.५४] |
| सत्यापन | Verify | [क.५८(२)] |
| सदृश परिस्थिती | Circumstances similar to | [क.१३(दोन)] |
| सर्वसामान्य व्यवहारदृष्टी | Ordinary prudence | [क.२१] |
| समावेशित | Admitted | [क.३०] |
| सामाईक | Common | [क. उदा. १] |
| स्वदस्तुरानिशी प्रमाणित केलेली नक्कल. | Copy, certified under one's hand | [क.६७] |
| संयुक्त | Joint | [क.६ उदा. १] |
| संपदा | Estate | [क.३४(२)] |
| संबंधनीय | Attributable | [क.३७] |
| संविदा | Contract | [क.५] |
| संव्यवहार | Transaction | [क.१६ (क)] |
| हस्तांतरिती | Transferee | [क.२९] |
| हानिरक्षण | Indemnify | [क.१०] |
| हिस्सेरशीने भरणा | Rateably pay | [क.४८(ख) (दोन)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय मुंबई